मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in  E mail - dainikyuvakaadhar@gmail.com  facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २१७ ■ शनिवार, १८ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# विदर्भात उष्णतेची लाट; जनजीवन विस्कळीत, शाळा-महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर

**नागपूर :** नागपूरसह विदर्भात उन्हाचा पारा वाढतच आहे सर्वसामान्य नागरिकांना घराबाहेर पडणंसुद्धा कठीण झालं आहे. पुढील दोन दिवस तापमान वाढीवच राहणार असल्याचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आलाय. हीट वेव्हचा यलो अलर्ट देण्यात आलाय. त्यामुळे शनिवारी (आज) नागपूर जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आलीय. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी या संदर्भातील आदेश काढलेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्य सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून नागपूर जिल्हा सीमा क्षेत्रातील सर्व अंगणवाडी, प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालय, कोचिंग क्लासेस यांना आज १८ एप्रिलला सुट्टी जाहीर केली आहे.

रस्ते पडले ओस - उष्णतेच्या लाटेमुळे (Heat Wave) तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. अधिक उष्णतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये यासाठी नागपूर जिल्हा प्रशासनाच्या वतीनं काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. तापमान वाढल्यामुळं रस्त्यावरील वर्दळ फारच कमी झाली आहे. शहरातील सर्व रस्ते ओस पडलेले आहेत.

**विदर्भातील अनेक जिल्ह्याचे तापमान ४४पेक्षा अधिक** - विदर्भात उन्हाचा तडाखा वाढलाय. पाऱ्यानं ४४ अंशावर उसळी घेतलेली आहे. अकोला, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, अमरावती ही सर्वाधिक 'हॉट शहरं' ठरलेली आहेत.



विदर्भातील तीन शहरांचं तापमान ४४ अंश सेल्सिअसच्या पुढे गेलं आहे, तर तर पाच शहरांचं तापमान ४३ डिग्री पेक्षाही जास्त आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या काम धंद्यावर प्रचंड परिणाम दिसून येत आहे. तापमानाची दाहकता वाढल्यामुळे सकाळी ११ नंतर तर घराबाहेर पडणं देखील कठीण झालं आहे. पुढील दोन दिवसात उन्हाचे चटके अधिक तीव्र होणार आहेत. तापमानचा पारा ४५ ते ४६ डिग्री सेल्सिअसपर्यंत वाढण्याचा अंदाज नागपूर वेधशाळेकडून वर्तवण्यात आला आहे.

**आणखी दोन दिवस यलो अलर्ट** - असह्य ऊन, उकाड्याने नागपूरकर कमालीचे त्रस्त झाले आहेत. उन्हाचा तडाखा लक्षात घेता दुपारच्या सुमारास घराबाहेर पडायचीही हिंमत होत नाही. सूर्य मावळल्यानंतर बराच वेळेपर्यंत उन्हाच्या झळा जाणवत असतात. हवामान विभागानं ८ दिवसांसाठी 'यलो अलर्ट' दिलेला होता. त्यापैकी अद्याप ही दोन दिवस शिल्लक आहेत. आठवड्याच्या शेवटी तापमानाचा पारा ४५ डिग्रीचे पार करण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. एप्रिलमध्ये ही भयानक स्थिती आहे, तर सर्वाधिक उन्हाच्या मे महिन्यात किती ऊन तापेल, याची कल्पनासुद्धा करवत नाही. यंदाचा उन्हाळा भयंकर तापणार असल्याचा इशारा यापूर्वीच भारतीय हवामान विभागानं दिला आहे.



**पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर:-माळशिरस तालुक्यातील बचेरी या ठिकाणी सद्गुरु श्री .श्री. साखर कारखान्याकडे जाणाऱ्या रस्त्यालगत श्री. खंडेरायाचे मंदिर आहे या मंदिरासमोर माने परिवार व श्री .खंडेरायांचे असंख्यभक्त ग्रामस्थ यांच्या सहकार्याने अतिशय उल्हासामध्ये आणि उत्साहामध्ये यात्रेचा कार्यक्रम पार पडला. प्रसंगी धार्मिक विधी अतिशय चांगल्या पद्धतीने पार पडले. श्री. खंडेरायांचे दर्शन घेण्यासाठी भाविक भक्तांनी बहुगर्दी केल्याचे दिसून आले.**

**( दैनिक युवक आधार )**

## श्री .संत बाळगीर महाराज स्वच्छता अभियान अंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्वच्छता मोहीम राबविण्यात आली



**दैनिक युवक आधार :**

**उमरी वार्ताहर /रुपेशकुमार ग.श्रीरामवार :** उमरी येथे महाराष्ट्र राज्याचे ब्रँड ॲम्बेसेडर स्वच्छता दूत तथा महाराष्ट्र शासन नियुक्त औद्योगिक प्रशिक्षण संस्था मार्गदर्शक राष्ट्रसंत सद्गुरू साईनाथ महाराज वसमतकर यांनी दि.16 एप्रिल 2026 रोजी उमरी येथील संतकवी दासगणू शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था उमरी येथे श्री.संत बाळगीर महाराज स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. व तसेच गुरु महाराजांनी प्रतेक स्टोअर ची पाहणी केली.आणि सर्वप्रथम छत्रपती शिवाजीमहाराज संत गाडगे महाराज्यांच्या प्रतिमेचे पूजन करून संतकवी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना अमूल्य असे मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थेचे प्राचार्य श्री गायकवाड जे.एल यांनी गुरु महाराजांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.उपप्राचार्य श्री परदेशी एम.बी, आणि सौ. भोसले ए.सी, सौ. गुजरावर एस डी,श्री अजय माळी, श्री फोले बी.के, श्री सचिन देशमाने, श्री पवार आर. पी, श्री विकास देशमाने, बितनाळचे (उपसरपंच) देविदास अक्कमवाडलक्ष्मण वाघमारे,व आसपासचे सर्व भक्त मंडळी उपस्थित होते. व संस्थेमध्ये कार्यक्रमाची ही आनंदाची घेऊन करण्यात आली.

## पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडको प्रकल्पग्रस्त शेतकरी व त्यांच्या वारसांना महानगरपालिकेची ए-२ श्रेणीतील कंत्राटे देण्याची प्रकल्पग्रस्त ठेकेदार संघटनेची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल , ( वार्ताहर )** : पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडको प्रकल्पग्रस्त शेतकरी व त्यांच्या वारसांना महानगरपालिकेची ए-२ श्रेणीतील कंत्राटे देण्याची प्रकल्पग्रस्त ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष शशिकांत डोंगरे व इतर पधाधिकाऱ्यानी महापौर नितीन पाटील तसेच विरोधी पक्ष नेते अरविंद म्हात्रे याना दिलेल्या निवेदनाद्वारे दिली आहे . या निवेदनात म्हटले आहे की , प्रकल्पग्रस्त शेतकरी व त्यांचे वारस आमची जमीन सिडको महाराष्ट्र शासन नवी मुंबई प्रकल्पा करता संपादित झालेली आहे. उदरनिर्वाह करता आमचे कडे त्यावेळी कोणतेही साधन नव्हते म्हणून कालांतराने सिडको प्रशासनाने स्थानिक प्रकल्पग्रस्त करिता





एक जी. आर. काढून ए-२ श्रेणीतील कंत्राटी कामे प्रकल्पग्रस्ता करिता देण्याचे सुरू केले. गेले ३०-५० वर्षे ही कामे प्रकल्पग्रस्त शेतकरी व त्यांचे वारस यांना व्यवस्थित रितीने पूर्ण केलेली आहेत. तसेच कामा संबंधी कोणतीही तक्रार महामंडळ कडून करण्यात आलेली नाही परंतु सन २०१६ मध्ये पनवेल महानगर पालिकेची निर्मिती झाल्यानंतर सिडको मधील बहुतेक विभाग महानगर पालिकेत वर्ग करण्यात आली. त्यामुळे आम्हा प्रकल्प ग्रस्तांना मिळणारी ए-२ ची कंत्राटी कामे बंद झाल्याने आमचे उपजिवीकेचे साधन बंद झाली आहेत. तरी कृपया आपणास नम्र निवेदन आहे की, आम्हा प्रकल्पग्रस्तांना ए-२ श्रेणीतील कामे सिडको प्रमाणे पुर्ववत चालू करावी तसेच आम्हांला इतकी वर्षे विविध कामे करत असल्यामुळे कामाच अनुभव आहे. तरी आपणास नम्र विनंती आहे की आम्हा प्रकल्पग्रस्तांना ए-२ श्रेणीतील कंत्राटी काम नडको प्रमाणे पुर्ववत मिळावे अशी मागणी त्यांनी केली आहे . यावेळी प्रकल्पग्रस्त ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष शशिकांत डोंगरे , स्थायी समिती सभापती बबन मुकादम , नगरसेवक हरिश केणी , प्रकाश म्हात्रे यांचा सह इतर पदाधिकारी उपस्थित होते .

## श्री संत भगवान बाबा व संत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे १९ एप्रील रोजी डॉ .विक्रम सारूक यांचे किर्तन .

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** बीड शहरातील श्री संत भगवान बाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड, बीड येथे संत वामनभाऊ, संत भगवान बाबा यांच्या कृपा आशिर्वादाने प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षी ही संत वामनभाऊ, संत भगवान बाबा, संत तुकाराम, विठ्ठल-रूक्मिणी, हनुमान देवता मुर्ती प्राणप्रतिष्ठेच्या १४ व्या वर्धापन दिना निमित्त सर्व



धर्म समभाव राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक दि.१९ /०४ / २०२६ ते २१ /०४ / २०२६ या कालावधी मध्ये त्रिदिवशीय हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचे प्रथम दिनी. दि. १९ एप्रील रविवार रोजी रात्री ०८:०० वा. ह.भ.प. डॉ.विक्रम महाराज सारूक यांचे हरिकिर्तन होईल. तरी बीड शहरातील व परीसरातील भाविक भक्तांनी या किर्तन श्रावणाचा लाभ घ्यावा असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक व श्री संत भगवान बाबा व श्री संत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी, बीड चे अध्यक्ष डॉ.राजेंद्र भाऊ सानप व प्रतिष्ठानचे सर्व सहकारी व इंद्रप्रस्थ कॉलनी परिसरातील भाविक भक्तांनी केले आहे.

## न्हावा शेवा पाणीपुरवठा टप्पा-३ वेळेत पूर्ण करा; आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रशासनाला निर्देश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : पनवेल महापालिकेत शुक्रवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत न्हावा शेवा पाणीपुरवठा योजना टप्पा-३ संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा सक्षम करणे अत्यावश्यक असल्याने ही योजना प्राधान्याने आणि वेळेत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधिकाऱ्यांना दिले.

या आढावा बैठकीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी महापालिका प्रशासनासोबत न्हावा शेवा टप्पा-३ पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा सविस्तर आढावा घेतला. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून (एमजेपी) सुरू असलेल्या या योजनेचे काम तांत्रिक अडचणींमुळे लांबणीवर पडले आहे. एप्रिल किंवा जूनअखेरपर्यंत पूर्ण होणारी ही योजना आता जुलैअखेरपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

पाइपलाइन टाकताना काही ठिकाणी जागा मालकांशी असलेले वाद तसेच



तांत्रिक अडथळे ही प्रमुख कारणे असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. या पार्श्वभूमीवर नगरसेवकांवर जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले असून, पाइपलाइन टाकण्याच्या कामात येणाऱ्या अडचणी तात्काळ सोडविण्यावर भर देण्यात येत आहे.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी नगरसेवकांना आपल्या प्रभागातील नागरिकांशी थेट संवाद साधण्याचे आवाहन केले. पाइपलाइन टाकताना स्थानिक पातळीवर निर्माण होणाऱ्या अडचणी, गैरसमज किंवा अडथळे दूर करण्यासाठी ग्रामस्थांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

या बैठकीस महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता प्रशांत भामरे, कार्यकारी अभियंता वेंगुर्लेकर, उपअभियंता रमेश वायदंडे, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे तसेच नगरसेवक प्रवीण पाटील, अजय बहिरा, सुमित झुंजारराव, रुचिता लोंढे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## पत्रकार मित्र असोसिएशनच्या अध्यक्षपदी प्रोफेसर एस . क्रिष्णकुमार ;उपाध्यक्षपदी सनीप कलोते, कार्याध्यक्षपदी नितीन जोशी, सचिवपदी राहुलजी बोर्डे, खजिनदारपदी राजन शेलार यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी** : संपूर्ण महाराष्ट्रभर कार्यरत असणारी व प्रामुख्याने पनवेल, रायगड, ठाणे, नवी मुंबई, कल्याण येथे सामाजिक कार्यात तसेच पत्रकार क्षेत्रात अग्रगण्य असणारी संस्था पत्रकार मित्र असोसिएशच्या नवनिर्वाचित पदाधिकारी यांची नवीन कार्यकारणी नुकतीच KVS ट्रस्टच्या महात्मा गांधी पब्लिक स्कुलच्या सभागृहात नुकतीच बैठकीद्वारे करण्यात आली. KVS ट्रस्टच्या शाळेतील सभागृहात झालेल्या या बैठकीत पत्रकार मित्र असोसिएशनचे सल्लागार जेष्ठ पत्रकार दीपक महाडिक, संजय नोगजा व संस्थापक केवल महाडिक यांच्या आदेशाने पत्रकार मित्र असोसिएशनच्या अध्यक्षपदी KVS ट्रस्टचे संस्थापक व महात्मा गांधी



पब्लिक स्कुलचे संस्थापक प्रोफेसर एस. क्रिष्णकुमार यांची सर्वानुमते अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी दैनिक क्षितिजपर्व वृत्तपत्राचे संपादक सनीप कलोते, कार्याध्यक्षपदी सार्थक टाइम्सचे संपादक नितीन जोशी, सचिवपदी समाजसेवक तथा आमदार विक्रांतदादा पाटील प्रतिष्ठानचे अध्यक्ष राहुलजी बोर्डे, खजिनदारपदी प्रसिद्ध उद्योजक राजन शेलार, सहसचिवपदी समाजसेवक प्रवीण शेंडे, सहखजिनदारपदी उद्योजक निशांत गोयल, प्रसिद्धीप्रमुखपदी संदीप डोंगरे, मुंबई अध्यक्षपदी सनील कदम, ग्रामीण अध्यक्षपदी शशिकांत दळवी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

पत्रकार मित्र असोसिएशन हि फक्त नावापुरते काम न करता पत्रकारांच्या खऱ्या समस्या तसेच विविध कार्यक्रम वेळोवेळी राबवित असते. भविष्यात त्यांच्याकडून पत्रकारांच्या हिताची व संघटनेच्या हिताची कामे होतील असे आश्वासन यावेळी नवनिर्वाचित अध्यक्षांनी व पदाधिकाऱ्यांनी दिले. पदाधिकाऱ्यांच्या या निवडीबद्दल सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे. यावेळी पत्रकार मित्र असोसिएशनचे पदाधिकारी व सभासद यांच्यासह मित्रपरिवार उपस्थित होते.

# 'शिका' मंत्राचा जागर: डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अडुळा बाजारच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची भेट

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : "पुस्तकांशिवाय माणूस अपूर्ण आहे" हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संदेश प्रत्यक्षात आणत महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टने सोमवारी श्री क्षेत्र अडुळा बाजार येथील माध्यमिक विद्यालयात एक प्रेरणादायी उपक्रम साकारला. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून 'अखंड वाचन प्रकल्पा'तील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

वाचन संस्कृतीला बळ, बाबासाहेबांना अभिवादन

आयएसओ नामांकन व नीती आयोग नोंदणीकृत एनजीओ असलेल्या महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टने 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या त्रिसूत्रीतील पहिल्या मंत्राला कृतीची जोड दिली. विद्यालयात गेल्या महिनाभर राबविलेल्या 'अखंड वाचन प्रकल्पा'त उत्स्फूर्त सहभाग नोंदवणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या हाती वही, पेन आणि प्रेरणादायी पुस्तकांचे संच देत त्यांचे मनोबल वाढवण्यात आले.

प्रतिमापूजनाने सुरुवात, विद्यार्थ्यांच्या भाषणाने भारावले वातावरण





कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर नवल वर्मा या विद्यार्थ्याने ओजस्वी वाणीने बाबासाहेबांचा जीवनपट उलगडला. शिक्षणासाठी त्यांनी केलेला संघर्ष, कोलंबिया विद्यापीठातील ग्रंथालयातील अखंड वाचन आणि संविधान निर्मितीतील ऐतिहासिक योगदान यावर त्याने मांडलेले विचार ऐकून उपस्थित शिक्षक-पालकही भारावले.

**'ग्रंथ हेच गुरु':**

प्रमुख अतिथी प्रदीप लांडे सर म्हणाले, "बाबासाहेबांनी प्रतिकूल परिस्थितीतही ५० हजारांहून अधिक ग्रंथांचे वाचन केले. 'ग्रंथ हेच गुरु' मानणाऱ्या त्या महामानवाला अभिवादन करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे वाचन संस्कृती वाढवणे. आज शालेय साहित्य घेताना या चिमुकल्यांच्या डोळ्यात दिसणारी चमक, हेच आमच्या कार्याचे खरे फळ आहे.

**मान्यवरांची उपस्थिती व सहकार्य**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टचे दानशूर आश्रयदाते व विश्वस्त अंबादास जावरकर होते. यावेळी विश्वस्त व प्रसिद्धी प्रमुख गजानन करुले, संचालक हरिदास कविटकर व मुख्याध्यापक बी. एल. हाडोळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक व खुमासदार सूत्रसंचालन विश्वस्त नितीन जुनगरे यांनी केले तर आभार अनिल तायडे यांनी मानले. अनिल शामतकर, भानुदास मावळे, प्रदीप कंटाळे यांच्या सहकार्याने कार्यक्रमाची सांगता झाली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या हाती पुस्तक देऊन त्यांचे भविष्य घडवणाऱ्या महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टच्या या उपक्रमाचे अडुळा बाजार व परिसरातून विशेष कौतुक होत आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा हा कृतीशील जागर ठरला.

## जोगेश्वरी पूर्वेत नालेसफाईत हलगर्जीपणा ; शिवसेना (उद्धव ठाकरे) दखल घेताच गाळ उचलण्यास सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**किशोर रमाकांत गुडेकर मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर Brihanmumbai Municipal Corporation (BMC) प्रशासनाकडून नालेसफाईची कामे जोरात सुरू असल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी ही कामे केवळ दिखाव्यासाठी होत असल्याचे चित्र समोर आले आहे.

जोगेश्वरी पूर्वेतील महाराज भवन ते ठाकूर नगर या रस्त्यावर नालेसफाई करताना काढलेला गाळ रस्त्याच्या कडेला तसाच टाकून ठेवण्यात येत होता. परिणामी, तोच ओला गाळ पुन्हा नाल्यात वाहून जाऊन साफसफाई निष्फळ ठरत असल्याची गंभीर बाब समोर आली होती.

स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने संताप व्यक्त केला जात होता. परिसरात दुर्गंधी पसरून आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता, तसेच पावसाळ्याच्या तोंडावर पूरस्थिती निर्माण होण्याची भीतीही व्यक्त करण्यात येत होती.

दरम्यान, या प्रकाराची दखल Shiv Sena (Uddhav Balasaheb Thackeray) पदाधिकाऱ्यांनी घेतल्यानंतर संबंधित यंत्रणा खडबडून जागी झाली. त्यांच्या पाठपुराव्यानंतर रस्त्याच्या कडेला टाकलेला गाळ तातडीने उचलण्यास सुरुवात करण्यात आली.

नियमांनुसार, नालेसफाईदरम्यान काढलेला गाळ त्वरित उचलून योग्य ठिकाणी विल्हेवाट लावणे आवश्यक असते. मात्र ठेकेदारांचा निष्काळजीपणा आणि अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष यामुळे कामे अर्धवट राहत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला इशारा देत, "नालेसफाईची कामे केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत, अन्यथा येणाऱ्या पावसाळ्यात गंभीर परिस्थिती निर्माण होईल," अशी मागणी केली आहे.

## पाटे ता. चांदवडचे भूमिपुत्र श्री. यशवंत ठोके सरांचा; "आदर्श क्रीडा शिक्षक" पुरस्काराने गौरव

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करणाऱ्या मुळचे पाटे ता. चांदवड येथील भुमिपुत्र तसेच नाशिक महाराष्ट्र समाज सेवा संघ संचलित रचना विदयालयाचे क्रीडाशिक्षक श्री. यशवंत ठोके सर यांना "आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार" प्रदान करून सन्मानित करण्यात आले. नाशिक येथे शिवसेनेच्या वतीने आयोजित या गौरव सोहळ्यात माननीय खासदार श्री. भगरे सर (दिंडोरी लोकसभा मतदार संघ) यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर प्रमुख मान्यवरांमध्ये महाराष्ट्र समाज सेवा संघाचे अध्यक्ष माननीय श्री. सुधाकर साळी सर, मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस




श्री नितीनजी ठाकरे, क्रांतिवीर वसंतराव नाईक संस्थेचे सरचिटणीस श्री. हेमंत धात्रक, संगमनेरच्या माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, शिक्षक नेते शिवाजीराव निरगुडे, साहेबराव कुटे, अरुण पवार, संग्राम करंजकर, रचना व नवरचना विद्यालयाचे सहकारी शिक्षक इ. मोठया संख्येने मान्यवर उपस्थित होते.

श्री. यशवंत ठोके सर यांनी विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाप्रेम, शिस्त, संघभावना आणि जिद्द निर्माण करण्यासाठी केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. क्रीडाशिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांची दखल घेत हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात आला.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी श्री. यशवंत ठोके सर यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या कार्यातून इतर शिक्षकांनीही प्रेरणा घ्यावी असे मत व्यक्त केले. तसेच भविष्यातही त्यांनी क्रीडा क्षेत्रात अशीच उज्ज्वल कामगिरी करावी अशा शुभेच्छा देण्यात आल्या. या सन्मानाबद्दल नाशिकच्या रचना विदयालयाचे श्री. यशवंत ठोके सर यांचे शैक्षणिक क्षेत्रातील सहकारी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार व कुंटुंब नातेवाईक या विविध स्तरांतून यशवंत ठोके सर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या या यशामुळे अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीसंदर्भात 587 गुन्हे दाखल 158 आरोपिंना अटक

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर** : अवैध गौन खनिज उत्खनन व वाहतुकीसंदर्भात नागपूर विभागात जिल्हास्तरावर भरारी पथक तसेच चेकपोष्टच्या माध्यमातून मागील वर्षभरात 2 हजार 478 प्रकरणात कारवाई करण्यात आली आहे. यासंदर्भात 587 गुन्हे दाखल करण्यात आले असून 55.39 कोटी रुपयाचा दंड आकारण्यात आला असल्याची माहिती विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिली.

अवैधपणे गौण खनिजाचे उत्खनन करणाऱ्याविरुध्द नागपूर विभागात विशेष मोहिम राबविण्यात आली असल्यामुळे अवैध वाहतुकीसंदर्भात कठोर कारवाई करण्यात आली आहे. विभागात सन 2025-26 या वर्षात 31 मार्चपर्यंत 2 हजार 478 प्रकरणामध्ये 55.39 कोटी रुपयाचा दंड आकारण्यात आला आहे. यापैकी प्रत्यक्ष 20.15 कोटी रुपयाचा दंड वसूल करण्यात आला आहे. अशी माहिती श्रीमती बिदरी यांनी दिली .

अवैध उत्खननासंदर्भात विभागात 587 गुन्हे दाखल करण्यात आले असून 158 आरोपिंना अटक करण्यात आली असून 1 हजार 512 वाहने जप्त करण्यात आली आहेत. यामध्ये 10 यंत्रसामुग्रीचा समावेश असल्याची माहिती विभागीय आयुक्त श्रीमती विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिली.अवैध उत्खनन व वाहतूक करण्याच्या प्रकरणात सर्वाधिक प्रकरणे वाळू, मुरुम व मातीच्या उत्खननासंदर्भात आहेत. विभागात सर्वाधिक भंडारा जिल्ह्यात 672 प्रकरणांची नोंद झाली असून यापैकी 637 प्रकरणे वाळू संदर्भातील आहेत. याअंतर्गत 363 गुन्हयामध्ये 5 कोटी रुपये दंड आकारण्यात आला. त्यापैकी 2 कोटी 82 लक्ष वसूल करण्यात आले आहे. तर 104 आरोपींना अटक करण्यात आली आहे.

गोंदिया जिल्ह्यात 641 प्रकरणामध्ये 3 कोटी 58 लक्ष दंड आकारण्यात आला आहे. यापैकी 3 कोटी 29 लक्ष रुपये वसूल करण्यात आले आहेत. नागपूर जिल्ह्यात 261 प्रकरणामध्ये 4 कोटी 32 लक्ष दंड आकारण्यात आला. त्यापैकी 3 कोटी 79 लाख दंड वसूल करण्यात आला. वर्धा जिल्ह्यातील 239 प्रकरणात 2 कोटी 75 लक्ष दंड आकारण्यात आला आहे. त्यापाक 2 कोटी 11 लक्ष वसूल करण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्ह्यात 431 गुन्हे दाखल करण्यात आले असून 6 कोटी 44 लक्ष रुपये दंड आकारण्यात आला त्यापैकी 5 कोटी 41 लक्ष रुपये वसूल करण्यात आले.

गडचिरोली जिल्ह्यात 234 प्रकरणे नोंदविण्यात आले असून 3 कोटी 24 लक्ष रुपये दंडापैकी 2 कोटी 60 लक्ष रुपयाचा दंड वसूल करण्यात आला आहे.

जिल्हा स्तरावर भरारी पथक व चेकपोष्टच्या माध्यमातून अवैध उत्खनन व वाहतुकीसंदर्भात ही कारवाई करण्यात आल्याची माहिती विभागीय आयुक्त श्रीमती विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिली.

## फुलमती लेआऊट, ऐश्वर्या नगर, एकता नगर,गल्ली न 2, शताब्दी नगर जवळ,नागपूर येथे डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**डॉ सुनिल भगत प्रतिनिधी :** नागपूर येथे संघमित्रा फाऊंडेशन व रमाई महिला मंडळ द्वारे , महात्मा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती निमित्त कार्यक्रम १६ एप्रिल २०२६ ला आयोजित करण्यात आला.

मी रमाई बोलतेय रमाई च्या जीवना वरील लघु नाटिका

शोभा गौतम पाटील यांनी सादर केली. सोबत गौतम पाटील ह्यांनी,डॉ बाबासाहेब आंबेडकर ची भूमिका सादर केली. अती कष्टमय जीवन माई रमाई व डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संसारात घालवून दीन दुबळ्या समाजाला अधिकार प्राप्त करून दिले त्याची प्रचिती,हृदयस्पर्शी अभिनयातून सादर केली, अनेक प्रेक्षक महिलांच्या डोळे नयनाश्रुनी पाणावले.







महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती राज्य कार्य कारणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी बुवाबाबा लोंकांना चमत्कार करून लुबाडतात त्याचे सादरीकरण केले. डॉ प्रा. सुनील भगत सर ह्यांनी संविधान विषयावर भाषण केले. डॉ अरविंद पुणवटकर ह्यांनी विवेकी वाटचाल वर प्रबोधन केले.महाराष्ट्र अंध श्रद्धा निर्मूलन समिती चे सक्रिय कार्यकर्ते देवयानी भगत, अशोक राऊत, उमेश चित्ते, वंदना मेंढे, मंगला गाणार, इंदू उमरे , अंजली भजने, व अन्य कार्यकर्ते ह्या कार्यक्रमाला हजर होते.कार्यक्रम उत्साहाने आयोजित करण्या साठी उत्सव समिती फुलमती लेआऊट राजेन्द्र कावरे, चंद्रगुप्त नरांजे, प्रज्ञावंत कांबळे, राहुल चक्रे, विजय पाटील व संघमित्रा फाउंडेशन चे प्रशांत मुंद्रे, सारिका मुंद्रे ,गुलशन राऊत, संगीता गायकवाड ,रजनीताई कावरे, स्मिता धोंगडे , चंद्रगुप्त नरांजे ,राहुल चक्रे, मृणाली तिरपुडे ,आदर्श पाटील ,देवर्ष गायकवाड, प्रज्ञावंत कांबळे, राजू धोंगडे, विजय पाटील, जया थूल ,शीतल मानकर , डॉ शितल चव्हाण ,अश्विनी फुलझले, अस्मिता लामसंगे, वंदना मेश्राम, मंगला लोखंडे, राजेंद्र कावरे ,गुरुदत्त मेश्राम, शैलेश गायकवाड, माया कांबळे, आणि सुरेखा नितनवरे, पद्माकर नितनवरेआणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## विर्शीमध्ये बिबट्याचा थैमान! ५ वर्षांच्या चिमुकलीला उचलून ठार — प्रशासन झोपेत?

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले लाखनी भंडारा** : विर्शी गावात बुधवारी (दि. १५ एप्रिल २०२६) पहाटे घडलेल्या भीषण घटनेने संपूर्ण परिसर हादरला आहे. बिबट्याने थेट मानवी वस्तीत घुसून अवघ्या ५ वर्षांच्या निष्पाप चिमुकलीचा बळी घेतला, आणि प्रशासन मात्र अजूनही गाढ झोपेत असल्याचा संताप नागरिक व्यक्त करत आहेत.

संजयजी कापगते यांच्या शेतात विटभट्टीच्या कामासाठी छत्तीसगडमधून आलेले काशीनाथ मिरी हे आपल्या कुटुंबासह राहत होते. पहाटे सुमारे ५ वाजताच्या सुमारास त्यांची लाडकी मुलगी अंशिका हिला बिबट्याने निर्दयपणे उचलून नेले आणि ठार मारले. या हृदयद्रावक घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

प्रश्न असा आहे की, बिबट्या गावात येईपर्यंत वनविभाग काय करत होता? याआधीही परिसरात वन्यप्राण्यांचा वावर असल्याच्या तक्रारी होत्या, तरीही कोणतीही ठोस कारवाई का करण्यात आली



नाही? निष्पाप जीव गमावल्यावरच प्रशासन जागे होणार का?

गावकऱ्यांमध्ये तीव्र संताप असून, तत्काळ बिबट्याचा बंदोबस्त करा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. नागरिक आता स्वतःच्या जीवाच्या भीतीने जगत असून, प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# शाळकरी मुलांचे पैसे परत न करता राळेगाव आगाराचे वाहकांची डबल बेल

## धानोरा गुरव येथील प्रकार राळेगाव आगाराची अमरावती फेरी

**दैनिक युवक आधार**

**नांदगाव खंडे प्रतिनिधी प्रदिप रघुते :** बस वाहकाने तिकिटाचे शिल्लक पैसे परत न करता शाळकरी मुलांची फसवणूक केल्याचा संताप जनक प्रकार उजेडात आला असून सदर एस.टी .वाहकावर कठोर कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी होत आहे. राज्य परिवहनच्या यवतमाळ विभागातील राळेगाव आगारातून सकाळी अमरावती करिता जाणाऱ्या बस मध्ये नांदगाव खंडेश्वर येथून शेकडो विद्यार्थी अमरावती धानोरा गुरव करिता प्रवास करतात दिनांक 13 एप्रिल सोमवार रोजी सकाळी साडेसात वाजता एम एच १४ एम एच.००७८ क्रमांक असलेल्या राळेगाव अमरावती या राज्य परिवहन राळेगाव आगाराचे बस मध्ये येनस येथिल प्रेमांशु रघुते हा विद्यार्थी धानोरा गुरव येथे कनिष्ठ महाविद्यालय मध्ये जाणे करिता प्रवास करीत होता सदर विद्यार्थ्याने बस वाहकाना तिकीट करिता 50 रुपयांची नोट वाहक एम. आर .पंडित यांना दिली असता सोळा रुपयाची तिकीट देऊन शिल्लक 34 रुपये तिकिटाच्या मागच्या बाजूला लिहून दिले प्रवास संपल्यानंतर उर्वरित पैसे प्रवाशाला परत करणे अपेक्षित असताना मात्र वाहक






पंडित यांनी सदर विद्यार्थ्यास पैसे परत न करता धानोरा बस स्थानकावरुन *डबल बेल* देऊन गाडी दामटण्याचा प्रकार केला सदर विद्यार्थ्यासह इतरही काही प्रवासी व विद्यार्थ्यांचे देह असलेले पैसे परत न केल्याची ओरड होत आहे उपरोक्त वाहक एम आर पंडित यांची या प्रकरणी चौकशी होऊन कायदेशीर कारवाईची मागणी होत आहे.

पैसे परत मागण्याचे नादात विद्यार्थी किरकोळ जखमी वाहक पंडित यांनी विद्यार्थ्यास खाली उतरून पैसे परत देण्याचे सांगितले मात्र सदर विद्यार्थी व इतर प्रवाशांना पैसे परत न करता डबल बेल देऊन बस चे फाटक ओढले मात्र सदर विद्यार्थी काही अंतरापर्यंत बस चे समांतर धावला आणि खाली पडून किरकोळ जखमी सुद्धा झाला. या प्रकरणाची तक्रार वरिष्ठान कडे करण्यात आली आहे.

## धोत्रा येथे भारतीय संघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी



**दैनिक युवक आधार**

**अतुल गोडांने चादुर रेल्वे प्रतिनिधी :** अमरावती जिल्ह्यातील तहसील चांदुर रेल्वे अंतर्गत जवळा धोत्रा येथे भारतीय संघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात डॉक्टर आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्यावर प्रकाश टाकत नागरिक व विद्यार्थ्यांना त्यांचे विचाराचे महत्व समजून माजी पोलीस पाटील.उत्तमराव गडलीग. यांनी सांगितले. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा बाबासाहेबांचा संदेश जीवनात आचरणात आणावा असे समजून सांगितले दरवर्षी प्रमाणे 14एप्रिल रोजी जेवणाची सुद्धा गावकऱ्यान साठी व्यवस्था करण्यात आली होती. धुमधडाक्यात मिरणुक काढुन जेयभिम च्या गजराने दुमदुमली धोत्रा नगरी.या क्रार्यकमाच्या यशस्वीतेसाठी.. सुमेध शामकुवर. पोलीस पाटील पंकज भाऊ जगताप.दिपक गजभिये.अमिद शामकुवर.नंदु गडलीग.पंकज शामकुवर.रमेशराव गजभिये.सौरभ शिंगाडे.सोनल शामकुवर.विक्रम कांबळे. अक्षय गडलीग .सोमेवर गोंडाने .तसेच इतरही गावातील नागरीक मोठ्या संख्येने हजर होते..

## सफाई कर्मचाऱ्यांसाठी मोठा दिलासा : कॅशलेस आरोग्य सेवा, घरकुल योजना व प्रलंबित प्रकरणांवर विशेष मोहीम

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष सतीश डागोर यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर महानगरपालिकेत सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांवर महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत त्यांच्या अडचणींच्या प्रभावी निराकरणासाठी ठोस उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावाही घेण्यात आला.

बैठकीत सर्व सफाई कर्मचाऱ्यांना १०० टक्के कॅशलेस आरोग्य सेवा (कार्ड) तातडीने लागू करण्याचे निर्देश देण्यात आले. यामुळे कर्मचाऱ्यांना आरोग्य सुविधांचा थेट आणि सुलभ लाभ मिळणार आहे. यासोबतच “डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य



आवास योजना” पारदर्शकपणे राबवून पात्र कुटुंबांना घरकुल व मालकी हक्क पट्टा देण्यावर भर देण्यात आला.

५ डिसेंबर २०२५ च्या शासन निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देताना अर्जासाठी असलेली एक वर्षाची अट व तीन अपत्यांची अट रद्द करण्यासोबतच सफाई कामगार पद सर्व समाजासाठी खुले करण्याचा निर्णय अधोरेखित करण्यात आला. प्रलंबित व नाकारलेल्या प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यावरही विशेष भर देण्यात आला.

याशिवाय, १०, २० व ३० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना वेळबद्ध पदोन्नती व आर्थिक लाभ देणे, दिहाडी कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतर कुटुंबाला सामाजिक सुरक्षा देणे तसेच पदस्थापनेत समानता राखण्याच्या सूचना देण्यात आल्या.

वाढत्या शहरी लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर नवीन सफाई कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करून तातडीने भरती करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच समाज कल्याण व मनपा योजनांचा समन्वय साधून लाभ थेट देण्यावर भर देण्यात आला. मेहतर बस्ती सुधार निधीतून वस्त्यांचे आधुनिकीकरण करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

दरम्यान, २२ जुलै हा दिवस “सफाई कामगार महोत्सव” म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेत दरवर्षी भव्य आयोजन करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. तसेच १९७५ ते १९९५ या कालावधीतील प्रलंबित प्रकरणे विशेष मोहिमेद्वारे निश्चित कालमर्यादेत निकाली काढण्याचे ठरविण्यात आले.

या बैठकीस महापौर नीता ठाकरे, आयुक्त डॉ. विपिन इटनकर, उपमहापौर लीला हाथीबेड, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, स्थायी समिती सभापती शिवाणी दाणी-वखरे, प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुळकर्णी, सहायक उपायुक्त सुकेशनी तेलगोटे यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.सफाई कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी ठोस निर्णय घेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## ठाणे जिल्ह्यात मानव अधिकार अधिनियमच्या महिला जनसंपर्क अधिकारीपदी सौ. निलिमा शिंदे यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** मानव अधिकार अधिनियम (ISO प्रमाणित) तसेच Crime Investigation Express या संस्थेच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या कार्यालयात महत्त्वपूर्ण नियुक्ती करण्यात आली असून, सौ. नीलिमा बळवंत शिंदे यांची ठाणे जिल्हा महिला जनसंपर्क अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



कळवा येथे सुरू करण्यात आलेल्या संपर्क कार्यालयामार्फत नागरिकांच्या विविध तक्रारी दररोज प्राप्त होत असून, त्या तातडीने व कायदेशीर पद्धतीने सोडविण्याचे काम प्रभावीपणे सुरू आहे. ही केवळ औपचारिक घोषणा नसून प्रत्यक्ष कार्यवाहीवर भर दिला जात असल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे.

संस्थेच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, कोणतीही समस्या असल्यास कळवा स्टेशन किंवा आंबिवली स्टेशनजवळील कार्यालयाशी संपर्क साधावा. तक्रार लेखी स्वरूपात आवश्यक कागदपत्रांसह सादर करणे बंधनकारक आहे.

यावेळी संस्थेने स्पष्ट केले की, प्रतिनिधींना कामासाठी बोलावल्यास त्यांच्या वेळेचा आदर राखणे व योग्य मोबदला देणे आवश्यक आहे. समाजसेवेच्या नावाखाली कोणत्याही प्रकारचा गैरफायदा सहन केला जाणार नाही. सर्व प्रतिनिधी स्वाभिमानाने कार्य करत असल्याचा संदेशही देण्यात आला.

तसेच, राजकीय नेते, कार्यकर्ते किंवा शासकीय अधिकारी यांनी दबाव, अरेरावी किंवा माज दाखवण्याचा प्रयत्न करू नये, अन्यथा अशा वर्तनावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

“न्याय हवा असेल—तर नियम पाळावे लागतील,” असा ठाम संदेश संस्थेच्या वतीने देण्यात आला.

**पदाधिकारी यादी :**

संपादक : निलेश यशवंत अनभवणे

निरीक्षण समिती सदस्य : रामनाथ दत्तु कोळी

प्रशासकीय अधिकारी : मुकुंद रामचंद्र ठाकूर

## वर्धा येथे महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचा सहावा दीक्षांत सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** भारताच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय चा सहावा दीक्षांत सोहळा आज उत्साहात पार पडला.

या सोहळ्यास महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचीही विशेष उपस्थिती लाभली. यावेळी शिक्षण, संस्कार आणि राष्ट्रनिर्मितीचा संगम असलेल्या विद्यापीठांमधून देशाच्या उज्ज्वल भविष्याला दिशा देणारी सक्षम आणि गुणी पिढी घडत असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

दीक्षांत समारंभात सुवर्णपदक, विविध पुरस्कार तसेच पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. विकसित भारताच्या




संकल्पपूर्तीसाठी ज्ञान, गुणवत्ता आणि नेतृत्व या त्रिसूत्रीवर आधारित युवा शक्ती देशाला नवे शिखर गाठून देईल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

या प्रसंगी राज्याचे शिक्षण राज्यमंत्री तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर, विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा, कार्यकारी परिषद सदस्य प्रा. सुरेंद्र दुबे यांच्यासह इतर मान्यवर, विद्यापीठाचे अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## वैज्ञानिक दृष्टिकोन आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर”



**दैनिक युवक आधार**

**डॉ सुनिल भगत प्रतिनिधी** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३५ व्या जयंतीनिमित्त, आम्रपाली बुद्ध विहार, गोपाल नगर , नागपूर येथे डॉ सुनील भगत प्रधान सचिव, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, जिल्हा नागपूर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि विज्ञानवाद यांचा जवळचा संबंध आहे.समोर जाऊन बुवाबाजी, महिलांचे शोषण , अंधश्रद्धा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यावर आपले विचार व्यक्त केले.उमेश चिट्टे , प्रधान सचिव, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, पश्चिम नागपूर हजर होते.कार्यक्रमाचे आयोजन आम्रपाली बुद्ध विहार समिती गोपाल नगर , नागपूर यांनी केले होते.श्री व श्रीमती धनविज, मेश्राम साहेब, गायकवाड ताई, सुनीता बोरघाटे , विजय बोरघाटे , भीमराव उमरे , मानसरंजन धारगावे , आणि १०० च्या आसपास मान्यवर मंडळी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## अमरावती जिल्ह्यातील अल्पवयीन मुलींच्या शोषणाचे प्रकरण अत्यंत संतापजनक व निंदनीय

### दोषींवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी . – अ .भा .वि .प .

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** अमरावती जिल्ह्यात उघडकीस आलेले अल्पवयीन व तरुण मुलींना जाळ्यात ओढून त्यांचे शारीरिक व मानसिक शोषण केल्याचे प्रकरण अत्यंत संतापजनक आणि गंभीर आहे. या घटनेत शेकडो मुलींना फसवून, त्यांची आक्षेपार्ह चित्रफीत तयार करून ब्लॅकमेल करण्यात आल्याचे समोर आले असून, हा प्रकार समाजाच्या सुरक्षिततेसाठी मोठा धोका निर्माण करणारा आहे.

या घटनेमुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सोशल मीडियाचा गैरवापर करून तरुणींना फसवणे, त्यांचा विश्वासघात करणे आणि नंतर दबाव टाकणे ही प्रवृत्ती अत्यंत घातक असून यावर कठोर नियंत्रण आवश्यक आहे.

या प्रकरणातील सर्व आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच यामागील संपूर्ण रॅकेट उघड करून संबंधित सर्व दोषींना शिक्षा व्हावी, अशी ठाम मागणी विद्यार्थी परिषदेची आहे. तपास यंत्रणांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून पीडित मुलींना न्याय मिळवून द्यावा. तसेच, पीडित मुलींना समुपदेशन, कायदेशीर मदत व संरक्षण देण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शाळा, महाविद्यालये व समाजामध्ये जनजागृती अभियान राबविणे आवश्यक आहे.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद विदर्भ प्रदेश मंत्री देवाशिष गोतरकर या विषयावर आपले मत व्यक्त करत म्हणाले की, "अमरावती जिल्ह्यातील अचलपूर-परतवाडा येथे समोर आलेल्या अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणाचा अत्यंत गंभीर आणि धक्कादायक प्रकरणाचा अखिल भारतीय विद्यार्थी परिषद तीव्र निषेध व्यक्त करते. फूस लावून शेकडो मुलींचे शोषण करत त्यांची अश्लील चित्रफीत तयार करून प्रसारित करणे हे केवळ अमानवीयच नव्हे, तर समाजाच्या नैतिकतेला हादरा देणारे कृत्य आहे. या प्रकरणात संबंधित आरोपींविरुद्ध पोक्सो (POCSO) आणि इतर कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, ही योग्य दिशा आहे. मात्र, या संपूर्ण प्रकरणाची सखोल, निष्पक्ष आणि जलद चौकशी व्हावी यासाठी विशेष तपास पथक (SIT) स्थापन करावे व फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवावा अशी विद्यार्थी परिषद ठाम मागणी करते. तसेच, या प्रकरणाच्या मागे कुठला समूह सहभागी आहे का? याची तपासणी देखील शासनाने करावी.

याआधी देखील अमरावतीत अशा घटना घडल्या आहेत, त्यामुळे महिलांच्या आणि अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना राबवावी तसेच, सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण आणण्यासाठी कठोर यंत्रणा महाराष्ट्र शासनाने उभी करावी. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद पीडित तरुणींच्याप्रती आपल्या संवेदना व्यक्त करते व त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. (सदर प्रसिध्दी पत्रक अभाविप विदर्भ प्रदेश कार्यालय मंत्री श्री.महेश डोकरीमारे यांनी नागपूर येथून प्रसिद्धीस दिले आहे.)

## त्रिमूर्ती प्रतिष्ठान तर्फे महामानवाची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/अकोट प्रतिनिधी :** विश्वभूषण बाबासाहेब डॉ. भिमराव आंबेडकर यांची १३५ वा जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा भव्यदिव्य अशा प्रकारच्या उद्बोधनात्मक शोभायात्रेचे आयोजन जयंती उत्सवाच्या निमित्ताने करण्यात आले होते. संपूर्ण गावातून डॉ.आंबेडकरांच्या विचारांना उजाळा देत शोभायात्रा फिरवण्यात आली. शोभायात्रमध्ये शाळकरी मुलांच्या वतीने लेझिम, नृत्य, गीत, लाठीकाठी अशा विविध सांस्कृतिक उपक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी ठिकठिकाणी इतर धर्मीय



नागरिकांच्या वतीने शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी सर्व सहभागी नागरिकांना पाणी तथा शरबत वाटप करण्यात आले. प्रतिष्ठान च्या वतीने यावर्षी विविध उपक्रम जयंती निमित्ताने आयोजित करण्यात आले. त्यामध्ये धम्मचर्चा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, व्याख्यानमाला यांचा समावेश होता.

यावर्षी काढण्यात आलेल्या शोभायात्रेची संकल्पना ही "समताधीष्ठीत समाज" ह्यावर आधारित होती. सर्व धर्मीय नागरिकांच्या कृतज्ञशील भावनेने सर्व वातावरण भिम ऊर्जेने भरून निघाले होते. महिला वर्गाच्या वतीने भिमस्तुती म्हणून घोषवाक्य आणि पाळणा गायन करण्यात आले.यावेळी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जयंती उत्सव समितीचे प्रमुख स्वप्निल सरकटे, विलास सरकटे, भास्कर पोहोरकर, शुभम सरकटे, सचिन सरकटे, सुधीर पळसपगार, संदीप सरकटे, राजकुमार सरकटे, सतिष भरक्षे, बोधानंद आरख, या सर्वांनी त्रिमूर्ती प्रतिष्ठान अध्यक्ष शेषराव सरकटे, मनिष सरकटे, सचिन सरकटे, रंजित सरकटे, दिलीप भरक्षे, विकास सरकटे, राहुल सरकटे यांच्या मार्गदर्शनात कार्य केले. यावेळी शोभायात्रेच्या कार्यक्रमाचे संचलन वानखडे गुरुजी यांनी तर प्रास्ताविक संस्था उपाध्यक्ष मनिष सरकटे यांनी केले. सदर कार्यक्रमाला त्रिमूर्ती प्रतिष्ठान च्या सर्व पदाधिकाऱ्यांसह येथील माजी शिक्षक गाढे गुरुजी, पत्रकार राजकुमार वानखडे,खन्नाडे मॅडमसह सर्व समाज वर्ग उपस्थित होता.

## देवगावमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : जिल्हा परिषद सेमी इंग्रजी मॉडेल स्कूल, देवगाव येथे दि. १४ एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच वैशाली आढांगळे होत्या.

यावेळी उपसरपंच लहानू मेमाणे, शालेय व्यवस्थापन समिती (SMC) अध्यक्ष राजेश गव्हाणे तसेच भागवत बोचरे, संतोष घाडगे, सचिन मेमाणे, फिरोज शेख आणि बबलू दुधाणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.



ईशान्वी शिंदे, विराज शिंदे, प्रगती गांगोडे, अथर्व म्हैसमाळे, कुणाल लोहारकर, प्राजल जोशी, रेणुका खरे, संस्कृती गव्हाणे, अक्सा काद्री, जोया शेख आणि आरोही गव्हाणे यांनी प्रभावी विचार मांडले.मुख्याध्यापक लहानू गावडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उज्वला देशमुख यांनी बाबासाहेबांच्या जीवनातील वाचनालयातील प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ सुरवाडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपशिक्षिका उज्वला देशमुख, देवयानी साळी, नुतन शेटे, विद्या वाघ, योगिता खैरनार आणि निता वायळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये लिव्हर क्लिनिकचा शुभारंभ

## यकृतासंबंधीत आजारांचे वेळीच निदान व व्यवस्थापनासाठी हॉस्पिटलचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** फॅटी लिव्हर, हिपॅटायटीस तसेच मद्यपानामुळे यकृताचे होणारे नुकसान आणि मेटाबॉलिक लिव्हर डिसऑर्डर यांसारख्या लिव्हरशी संबंधित आजारांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. यासाठी मेडिकव्हर हॉस्पिटलने पुढाकार घेत नवी मुंबईत लिव्हर क्लिनिक सुरू केले आहे. या क्लिनिकद्वारे लिव्हर आजारांचे वेळीच निदान, उपचार आणि दीर्घकालीन व्यवस्थापनासाठी स्क्रिनिंग व निदान सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

सध्या मधुमेह, लठ्ठपणा, हायपोथायरॉईडीझम, बैठी जीवनशैली, मद्यपान, व्हायरल हिपॅटायटीस बी व सी, ऑटोइम्यून लिव्हर डिसीज आणि अनुवंशिक लिव्हर डिसऑर्डरमुळे यकृताचे नुकसान होण्याचा धोका वाढतो. अनेक रुग्णांमध्ये सुरुवातीच्या टप्प्यात कोणतीही लक्षणे दिसत नाहीत आणि त्यामुळे या आजाराच्या निदानास विलंब होतो. उपचारास उशीर झाल्याने लिव्हर फायब्रोसिस, सिरोसिस किंवा लिव्हर फेल्युअर सारख्या गुंतागुंती निर्माण होतात. दुर्लक्ष केल्यास लिव्हरचे आजार हळूहळू वाढत जाऊन त्याचा एकूण आरोग्यवर आणि एखाद्या जीवनमानावर गंभीर परिणाम होतो.

हे लिव्हर क्लिनिक यकृताच्या आरोग्याच्या तपासणीसाठी सर्वसमावेशक दृष्टिकोन प्रदान करते. यकृताच्या गंभीर विकारांचा धोका असलेले रुग्ण ओळखून त्यांची वेळोवेळी तपासणी, सविस्तर वैद्यकीय मूल्यांकन आणि प्रगत निदान चाचण्या केल्या जातात. या क्लिनिकमध्ये आधुनिक उपचार पद्धतींद्वारे यकृताचे आजार सुरुवातीच्या टप्प्यात ओळखून त्याची भविष्यातील गुंतागुंत रोखण्यावर भर दिला जातो. विशेषतः मधुमेह, लठ्ठपणा, हायपोथायरॉईडीझम, मद्यपान, हिपॅटायटीस बी किंवा सी संसर्ग, तसेच कुटुंबात यकृतासंबंधी आजारांचा वैद्यकीय इतिहास असलेले आणि ऑटोइम्यून लिव्हर डिसीज असलेल्या व्यक्तींनी या स्क्रिनिंगचा लाभ घ्यावा. उच्च जोखमीच्या रुग्णांमध्ये प्रतिबंधात्मक उपायांवरही याठिकाणी भर दिला जाईल.




या क्लिनिकमध्ये लिव्हरच्या तपासणीसाठी फायब्रोस्कॅन, लिव्हर फंक्शन टेस्ट (LFT), कंप्लीट ब्लड काउंट (CBC), ट्रिपल मार्कर टेस्ट आणि निवडक रुग्णांसाठी अल्ट्रासाऊंड ॲब्डोमेन सारख्या चाचण्या केल्या जातात. या चाचण्यांमुळे लिव्हरमध्ये चरबीचे प्रमाण, सूज, फायब्रोसिस आणि लिव्हरच्या एकूण कार्यक्षमतेचे मूल्यांकन करता येते.

डॉ. दिपक अहिरे (गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट, हेपॅटोलॉजिस्ट आणि एंडोस्कोपिस्ट, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, खारघर ) म्हणाले,* बऱ्याचदा यकृतासंबंधी आजाराचे सुरुवातीच्या टप्प्यात कोणतीच लक्षणं दिसून येत नाहीत, त्यामुळे असे रुग्ण आमच्याकडे उपचारासाठी येतात तेव्हा आजार पुढच्या टप्प्यात पोहोचलेला असतो. मधुमेह, लठ्ठपणा, थायरॉईड विकार, मद्यपान, व्हायरल हिपॅटायटीस आणि अनुवांशिक कारणे ही यकृताच्या झालेल्या नुकसानाची प्रमुख कारणं आहेत. या लिव्हर क्लिनिकद्वारे यकृतासंबंधी आजारांचा धोका असलेल्या व्यक्ती ओळखून त्यांच्यावर वेळीच उपचार देण्याचा प्रयत्न करत आहोत. वेळीच तपासणी आणि जीवनशैलीत बदल केल्यास सिरोसिस आणि लिव्हर फेल्युअरसारख्या गंभीर गुंतागुंती टाळता येऊ शकतात.

डॉ. रावसाहेब राठोड (गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट, हेपॅटोलॉजिस्ट आणि थेरप्युटिक एंडोस्कोपिस्ट, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, खारघर) सांगतात की,* अनेक यकृताचे आजार हे योग्य वेळी निदान झाल्यास टाळता येऊ शकतात किंवा ते नियंत्रणात आणता येतात. लिव्हर क्लिनिकमध्ये फायब्रोस्कॅन, लिव्हर फंक्शन चाचण्या आणि आवश्यकतेनुसार इमेजिंग सारख्या प्रगत निदान पद्धतींचा वापर केला जातो. त्वरित उपचारांसोबतच जीवनशैलीत बदल, आहार मार्गदर्शन आणि नियमित फॉलो-अपवरही भर दिला जातो. आमचे उद्दिष्ट हे केवळ आजारावर उपचार करणे नाही, तर त्याची प्रगती रोखून दिर्घकाळासाठी रुग्णांच्या यकृताचे आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न केला जातो.

डॉ. विक्रम धारप,( गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट, हेपॅटोलॉजिस्ट आणि थेरप्युटिक एंडोस्कोपिस्ट,मेडिकव्हर हॉस्पिटल्स, खारघर) म्हणाले की,* आजच्या बदलत्या जीवनशैलीमुळे कोणतीही लक्षणं न दिसता वाढणारे यकृताचे आजार हा एक चिंतेचा विषय ठरत आहे. त्यामुळे प्रतिबंधात्मक चाचणी, संतुलित आहार, नियमित व्यायाम करणे तसेच मद्यपानावर सारख्या व्यसनांपासून दूर राहणे अत्यंत गरजेचे आहे. या लिव्हर क्लिनिकच्या माध्यमातून आम्ही केवळ उपचारच नाही, तर जनजागृती आणि प्रतिबंधावरही तितकाच भर देत आहोत, जेणेकरून रुग्णांना गंभीर अवस्थेपर्यंत पोहोचण्यापूर्वीच या अशा आजारांना आळा घालता येईल.

संदीप जोशी , सेंटर हेड- मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नवी मुंबई सांगतात की,* मेटाबॉलिक आणि जीवनशैलीशी संबंधित यकृताच्या आजारांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे पहायला मिळते. यासाठी वेळीच तपासणी आणि उपचारांची गरज लक्षात घेता लिव्हर क्लिनिकच्या माध्यमातून मेडिकव्हर हॉस्पिटलने तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सुलभ आणि दर्जेदार सेवा पुरव निश्चयकेला आहे,

ज्यामुळे नागरिकांना यकृतासंबंधी आजार वेळीच ओळखून निरोगी जीवन जगता येईल.

---

# सिल्लोडमध्ये 'सिंदूर' व 'जारूळ' वृक्षांचे रोपण

## जिल्हाधिकारी विनय गौडा यांची उपस्थिती ; 'ऑपरेशन सिंदूर'च्या स्मृतींना उजाळा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर /सिल्लोड:-** भारतमातेचे सौभाग्य व 'ऑपरेशन सिंदूर'चे समर्पण प्रतीक असलेले 'सिंदूर' तसेच महाराष्ट्राचे राज्यपुष्प असलेल्या 'जारूळ' वृक्षाचे पंचायत समितीच्या प्रांगणात जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते गुरुवारी रोपण करण्यात आले. राष्ट्रीय शौर्य आणि समृद्ध निसर्ग वारसा यांचा संगम साधणारा हा उपक्रम प्रशासकीय स्तरावर कौतुकास्पद ठरला आहे.



गतवर्षी एप्रिल महिन्यात पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २६ निरपराध भारतीयांची हत्या करून माता-भगिनींचे सौभाग्य पुसले होते. त्या पीडितांना व देशाला न्याय मिळवून देण्यासाठी पाकिस्तान व दहशतवाद्यांच्या विरोधात यशस्वी 'ऑपरेशन सिंदूर' राबवण्यात आले. या विजयाचे व भारतमातेच्या सौभाग्याचे प्रतीक म्हणून देशात सर्वप्रथम सिल्लोड येथील वृक्षसंवर्धक व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पर्यावरण विभागाचे दायित्व असलेले डॉ. संतोष पाटील यांनी केळगाव येथील शहीद स्मारकाजवळ जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वाचे 'सिंदूर' वृक्ष रोपण केले होते. या ऐतिहासिक कार्याची वार्ता देशभर झाल्यानंतर ५ जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना संघाच्या माध्यमातून हे रोप देण्यात आले व पंतप्रधानांनी आपल्या निवासस्थानी या वृक्षाचे रोपण केले आहे.

'जारूळ' हे राज्याचे राज्यपुष्प व हरित मानचिन्ह आहे. या वृक्षांवर मोठी फुलपाखरे, कीटक व जैवविविधता अवलंबून असल्यामुळे आज जिल्हाधिकारी विनय गौडा, उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, वृक्षप्रेमी असलेले गट विकास अधिकारी रत्नाकर पगार, तहसीलदार संजय देवराये, भाजप नेते सुरेश बनकर, पंचायत समिती उपसभापती भगवान आहेर ,संकल्पक डॉ. संतोष पाटील तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सर्व पदाधिकारी व कर्मचारी यांच्या हस्ते हे रोपण करण्यात आले.

> **"प्रत्येक शाळेच्या आवारात व शासकीय कार्यालये येथे जारूळचे रोपण केले जाईल. या राज्यपुष्पाचा दर्जा व राज्याचे हरित मानचिन्ह असलेल्या या सुंदर झाडाचे संवर्धन करण्यासाठी ५ जूननंतर शालेय सत्र सुरू झाल्यावर राज्यास भूषणावह असे कार्य आपणास करायचे आहे."**
>
> **रत्नाकर पगार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती सिल्लोड.**
>
> **"रंगाच्या पलीकडे सिंदूर वृक्षाचे पर्यावरणीय महत्त्व मोठे आहे. 'मॅन फेस बग' नामक कीटक या वृक्षाच्या फळांच्या टरफलावरील तंतू खातो, तर 'लॉबस्टर' नामक पतंग या पानांवर अधिवास करतो. यावर लाखेच्या किटकांचाही अधिवास आढळतो."**
>
> **— डॉ. संतोष पाटील, पर्यावरण अभ्यासक, सिल्लोड.**

# माहोरा जिल्हा परिषद शालेय समिती अध्यक्षपदी निवड



**दैनिक युवक आधार**

**भाऊसाहेब आव्हाड (माहोरा सर्कल प्रतिनिधी) :** जिल्हा परिषद प्रशाला माहोरा ता.जाफराबाद जिल्हा जालना शालेय समिती बिनविरोध निवड झाली आहे अध्यक्ष परमेश्वर प्रल्हादशिंग साळोक उपाध्यक्ष वैशाली दिनेश वाघमारे. तर सदस्य दुर्गा गणेश शिरसाट. ज्योती संतोष धारे. अनिल नामदेव काळे. संतोष मैनाजीराव वरपे. दीपक सुनील इंगळे. राणी अमोल शिरसाट. वैशाली सतीश जाधव, हमीद हबीब सय्यद, संगीता गणेश गायकवाड, रंजना विलास ढाले, अकील फकीरा सय्यद, गौतम बाबुराव सोनवणे, अभिजीत नरेश थारेवाल, संगीता भानुदास बोर्डे, सर्व सदस्य व ज्येष्ठ नागरिक सरपंच गजानन पाटील लहाने उपसरपंच भास्कर सोनवणे माजी उप (माजि उपसरपंच) गजानन पाटील साळोख (माजिउप सरपंच) हबीब कमाल, ( माजीउप सरपंच) बाबासाहेब बोरसे, मुख्याध्यापक चेकेसर सूत्रसंचालक गजानन छडीदार आभार प्रदर्शन गणेश पवार व गावातील पदाधिकारी सर्वांच्या उपस्थितीमध्ये शाली समितीची निवड अध्यक्ष उपाध्यक्ष व सदस्यांना हार घालून स्वागत करण्यात आले व शाली समितीची निवड शांततेत पार पडली

---

# पनवेलमधील शांतीनिकेतन पब्लिक स्कूलचा १००% निकाल, विद्यार्थ्यांची दमदार कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** शांतीनिकेतन पब्लिक स्कूल, न्यू पनवेल येथील इयत्ता दहावी (CBSE) परीक्षेचा निकाल यंदा उल्लेखनीय लागला असून शाळेने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. शैक्षणिक वर्ष 2025-26 साठी जाहीर झालेल्या या निकालात एकूण २३९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि सर्व २३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

यंदाच्या निकालात ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६० असून ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण (डिस्टिंक्शन) मिळवणारे १२५ विद्यार्थी आहेत. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शाळा व्यवस्थापनाचे प्रभावी नेतृत्व यामुळे हा उत्कृष्ट निकाल साध्य झाला आहे.या वर्षी शाळेची टॉपर अद्विता भगवंत कुंभार हिने ९९ टक्के गुण मिळवत अव्वल स्थान




पटकावले आहे. त्यानंतर किमया विजय गाडे, अनुष्का सिंह, सौरिष पांडे, सेजल ओतारी, आरश शर्मा आणि केतकी मानकर यांनी प्रत्येकी ९७ टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश मिळवले आहे.विषयानुसारही विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली असून कॉम्प्युटर ॲप्लिकेशन विषयात २ विद्यार्थ्यांनी आणि मराठी विषयात ४ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत.

# अखिल भारतीय विद्यापीठीय राष्ट्रीय स्पर्धेत मोरे महाविद्यालयाचा झेंडा उंचावला; ४ कांस्यपदकांची कमाई

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/ राहुल कुलकर्णी :** ८ एप्रिल २०२६ — कॅनॉइंग व कयाकिंग या वॉटर स्पोर्ट्स प्रकारातील अखिल भारतीय विद्यापीठीय राष्ट्रीय स्पर्धेत Savitribai Phule Pune University चे प्रतिनिधित्व करत निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत एकूण ४ कांस्यपदके पटकावली. या यशामुळे महाविद्यालयासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ही स्पर्धा Shivaji University Kolhapur आणि Royal Krishna Boat Club यांच्या संयुक्त विद्यमाने



सांगली येथे ४ ते ८ एप्रिल २०२६ दरम्यान पार पडली. देशभरातील सुमारे ४० विद्यापीठांच्या संघांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता.

महाविद्यालयाचे खेळाडू विशाल घोलप, प्रथमेश शिंदे, अथर्व महाजन आणि गणेश सानप यांनी K-200 मीटर या प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत प्रत्येकी कांस्यपदक मिळवले. त्यांच्या या यशामुळे त्यांची पुढील प्रतिष्ठेच्या 'खेलो इंडिया' स्पर्धेसाठी निवडही निश्चित झाली आहे.

याचबरोबर मुलींच्या K-4, 200 मीटर संघानेही उल्लेखनीय कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर चौथा क्रमांक पटकावला. या संघात साक्षी मोगल, ऋतुजा शिंदे, नेहा शिंदे, सानिका सोनवणे आणि मिजबा मुलानी यांचा समावेश होता.

त्यांच्या या यशामुळे त्यांनाही 'खेलो इंडिया' स्पर्धेत संधी मिळाली आहे.

स्पर्धेचे उद्घाटन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री Chandrakant Patil यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक चंद्रशेखर मोरे व प्रशिक्षक चेतन कुंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे पदाधिकारी—सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वासजी मोरे, सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, संचालक शिवाजी गडाख, महिला संचालक शोभाताई भागवत बोरस्ते तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, विभाग प्रमुख, प्राध्यापक व कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

महाविद्यालयाच्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये जलक्रीडा प्रकारांविषयी नवीन प्रेरणा निर्माण झाली असून भविष्यात आणखी मोठ्या यशाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

# कमल गौरी हिरू पाटील शिक्षण संस्थेच्या दी एलिट पब्लिक स्कूल सीबीएसई बोर्डचा निकाल उल्लेखनीय

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** कमल गौरी हिरू पाटील शिक्षण संस्थेच्या एलिट पब्लिक स्कूल सीबीएसई बोर्डचा निकाल उल्लेखनीय लागला आहे .

कमल गौरी हिरू पाटील शिक्षण संस्थेचे एलिट पब्लिक स्कूल सीबीएसई बोर्डचा लागला असून प्रथम अनुष्का महालिंग गस्तगार ९५.००%, द्वितीय श्रेया राहुल भरसाकले ९३.२०%, तृतीय माही नितेश गायकवाड ९२.००% चौथा अभिनव सूर्यदेव यादव ९०.२०% पाचवा अनुज प्रमोद कुशवाहा ९०.००% असा लागला आहे . या बद्दल संस्थेचे अध्यक्ष बबनदादा पाटील यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना तुमची उपलब्धी शाळेला अभिमान मिळवून देते आणि भावी विद्यार्थ्यांना प्रेरणा देत असल्याचे सांगितले




सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# सणसर ता .इंदापूर येथील महा महसूल समाधान शिबिर यशस्वी

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक,शेतकरी,विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या दैनंदिन प्रश्नांचे तातडीने निराकरण करण्यासाठी महसूल विभागाच्या वतीने महा महसूल समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर १७ एप्रिल रोजी सणसर येथील पालखी तळावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराच्या अंतर्गत पार पडले. यावेळी प्रशासनाचे मार्गदर्शन म्हणून तहसीलदार जीवन बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले यावेळी सरपंच यशवंत पाटील सौ माधुरी भिसे ज्योस्त्ना सुरडकर पुरवठा विभागाचे जाधव साहेब ग्रामसेवक सचिन पवार ग्राममहसूल अधिकारी वाव्हळ भाऊसाहेब युवा उदयोजक सागर भिसे पै.अजित सोनवणे प्रतिक जगताप धीरज साळुंके राजेंद्र कदम रियाज सय्यद अमोल मेरगळ आखिल मेरगळ, इराप्पा सोलापुरे,आरोग्यसेविका कामथे मॅडम, योगेश पांडुळे,सागर कांबळे,पै.बबन सोनवणे बॉबी सकट आदी उपस्थित होते

या शिबिराचे आयोजन जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, अप्पर जिल्हाधिकारी सतीश राऊत,उपविभागीय अधिकारी उत्तमराव दिघे तसेच इंदापूरचे तहसीलदार जीवन बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. मंडळ अधिकारी शरद गोडे यांनी शिबिर यशस्वीपणे संपन्न झाल्याची माहिती देण्यात आली.यावेळी शिबिरात सेवा उपलब्ध करून नागरिकांना एकाच ठिकाणी विविध महसूल सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.यामध्ये ७/१२ उताऱ्यातील दुरुस्ती,डिजिटल सातबारा वाटप,

उत्पन्न,रहिवासी व जात प्रमाणपत्रे,अकृषिक परवानगी विद्यार्थ्यांसाठी आवश्यक दाखले,पीएम किसान नोंदणी ज्येष्ठ नागरिक,विधवा व दिव्यांगां साठी सामाजिक अर्थसहाय्य योजना अॅग्रीस्टॅक आरोग्य सेवा अशा सुमारे १५ प्रकारच्या सेवांचा समावेश करण्यात आला होता.नागरिकांच्या तक्रारी तत्काळ निकाली काढण्याचा प्रशासनाचा प्रयत्न झाला.शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून या सुविधांचा लाभ घेतला. मंडळ अधिकारी शरद गोडे यांनी सांगितले की, या शिबिरामुळे नागरिकांना महसूल विभागाच्या सेवा सुलभपणे मिळाल्या.सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटातील जवळपास अकरा गावे या शिबिरात समाविष्ट होती.परिसरातील दिव्यांग बांधवांना येण्या-जाण्याठी जिल्हा परिषद सदस्या सौ माधुरी सागर भिसे यांनी अडचण येऊ नये म्हणून गाडीची विशेष व्यवस्था करण्यात आली होती.सणसर येथील महा महसूल समाधान शिबिर हे प्रशासनाच्या प्रयत्नांमुळे आणि नागरिकांच्या सहभागामुळे यशस्वीपणे संपन्न झाले.या शिबिरामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या दैनंदिन प्रश्नांचे तातडीने निराकरण मिळाले आणि महसूल विभागाच्या सेवांचा लाभ एकाच ठिकाणी घेता आला.

# ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलचा दणदणीत निकाल; CBSE दहावीमध्ये बीडमध्ये रचला इतिहास

## मराठी विषयात 90% पेक्षा जास्त गुण मिळवणारे तब्बल 48 विद्यार्थी

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी भीमराव गावडे** : बीड जिल्ह्यातील अग्रगण्य ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल, सोमेश्वर नगर, बार्शी रोड, बीड. स्कूलने CBSE दहावी बोर्ड परीक्षेत अभूतपूर्व यश संपादन करत नवा इतिहास रचला आहे. 15 एप्रिल 2026 रोजी जाहीर झालेल्या निकालात शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधून घेतले.

यंदा शाळेच्या एकूण 60 विद्यार्थ्यांपैकी तब्बल 33 विद्यार्थ्यांनी 90% पेक्षा अधिक गुण मिळवले. विशेष म्हणजे मराठी विषयात 48 विद्यार्थ्यांनी 90% पेक्षा अधिक गुण मिळवत विक्रमी यश मिळवले आहे. बीड जिल्ह्यातील CBSE शाळांमध्ये असा निकाल प्रथमच पाहायला मिळाल्याने सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.




या यशाबद्दल बीडचे आमदार संदिप क्षीरसागर यांनी संस्थेचे सचिव प्रा. विजय पवार यांचे विशेष अभिनंदन केले.विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक कामगिरीतही उल्लेखनीय यश दिसून आले. विश्वास पवार याने हिंदी विषयात 100 पैकी 100 गुण मिळवत एकूण 94.40% मिळवले. विनोद गोगूले याने मराठी विषयात 100 पैकी 100 गुण मिळवून 93.80%. स्वरित संतोष इंदे याने मराठीत 100 पैकी 100 गुण मिळवत (97.80%) प्रथम क्रमांक पटकावला. गार्गी उत्तरेश्वर चळवदे हिने इंग्रजी विषयात 100 पैकी 100 गुण मिळवून 97.40%द्वितीय क्रमांक , तर शौर्य प्रकाश बोराडे याने संगणक विषयात 100 पैकी 100 गुण (97.20%)मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. प्रथमेश भीमराव शिंदे (96.40%) चतुर्थ, तर सय्यद अराईका खालेद आणि सुरज बाळू झांजे (95.40%) यांनी पाचवा क्रमांक मिळवला.

विषयवार निकालातही शाळेची दमदार कामगिरी दिसून आली. इंग्रजीत 33, मराठीत 48, हिंदीत 37, गणितात 11, विज्ञानात 13, सामाजिक शास्त्रात 18 आणि संगणक विषयात 37 विद्यार्थ्यांनी 90% पेक्षा अधिक गुण मिळवले.या यशामागे प्रा. विजय पवार यांचे प्रभावी मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. त्यांनी शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्यात उत्कृष्ट समन्वय साधत सातत्याने मार्गदर्शन केल्यामुळे हा उल्लेखनीय निकाल शक्य झाला.या यशाबद्दल प्राचार्या यास्मिन सय्यद, समन्वयक देशमुख सर व सर्व शिक्षकांचे अभिनंदन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष प्रा. राम सर यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलचा हा निकाल "न भूतो न भविष्यती" असा ठरला असून, बीड जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात नवा आदर्श निर्माण झाला आहे.

# उन्हाच्या तडाख्यात आरोग्य जपा; डॉ.भागवत कालापाड यांचे आवाहन

## उष्णतेच्या लाटेत आरोग्य जपण्यासाठी मार्गदर्शन ; घरगुती उपायांचा करा अवलंब

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : उन्हाळ्याच्या दिवसांत वाढत्या तापमानामुळे उष्णतेची लाट तीव्र होत असून उष्माघात (हीट स्ट्रोक) होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ही एक गंभीर व जीवघेणी अवस्था असून नागरिकांनी याबाबत विशेष सतर्कता बाळगावी, असे आवाहन ऑक्यू. आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष तसेच माहिती अधिकार पत्रकार संरक्षण समिती व पोलीस मित्र, वाशिमचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. भागवत नारायण कालापाड यांनी केले आहे.



सामान्यतः मानवी शरीराचे तापमान 98.6 फॅरेनहाइट (37°C) इतके असते. मात्र हे तापमान अत्याधिक वाढल्यास (हायपरथर्मिया) किंवा कमी झाल्यास (हायपोथर्मिया) शरीराच्या अवयवांवर दुष्परिणाम होऊ शकतो. उष्माघात म्हणजेच सनस्ट्रोक किंवा हीट स्ट्रोक ही अशीच एक धोकादायक स्थिती असून वेळेत उपचार न झाल्यास ती जीवघेणी ठरू शकते.

उष्माघात टाळण्यासाठी दुपारी 12 ते 3 या वेळेत बाहेर जाणे टाळावे. तापमान जास्त असताना बाहेर राहावे लागल्यास थकवणाऱ्या हालचाली टाळाव्यात आणि वेळोवेळी पाणी पिणे आवश्यक आहे. तहान लागली नसली तरीही शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये यासाठी नियमित पाणी सेवन करावे.

घराबाहेर पडताना हलक्या रंगाचे, सैल व सुटसुटीत कपडे परिधान करावेत. डोळ्यांसाठी गॉगल्स, तसेच डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा. पायात बूट किंवा चपला वापरणेही आवश्यक आहे. अल्कोहोल, चहा, कॉफी व कार्बोनेटेड पेये यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते, त्यामुळे अशा पेयांचे सेवन टाळावे.

उघड्यावर काम करणाऱ्यांनी विशेष काळजी घेऊन टोपी किंवा छत्रीचा वापर करावा. तसेच ओल्या कापडाने डोके, मान, चेहरा व हात-पाय पुसल्यास शरीराला थंडावा मिळतो. चक्कर येणे, अशक्तपणा जाणवणे किंवा तब्येत बिघडल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवण्यासाठी लस्सी, तांदळाचे पाणी, लिंबू सरबत, टरबूज, द्राक्षे, नारळ पाणी आणि ताक यांसारख्या घरगुती पेयांचे सेवन करणे फायदेशीर ठरते.

उष्णतेच्या वाढत्या तीव्रतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी योग्य काळजी घेऊन स्वतःचे आरोग्य सुरक्षित ठेवणे अत्यंत गरजेचे असल्याचेही डॉ. कालापाड यांनी सांगितले.

# अडोळीतील कर्जमाफी आंदोलन पेटले; रविकांत तुपकरांचा एल्गार — राज्यभर तीव्र लढ्याची हाक!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : मौजे अडोळी येथे मागील सहा दिवसांपासून सुरू असलेल्या शेतकरी कर्जमाफीसाठीच्या अन्नत्याग आंदोलनाला आज निर्णायक वळण मिळाले. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री रविकांत तुपकर यांनी आंदोलनस्थळी भेट देत शेतकऱ्यांच्या लढ्याला जाहीर पाठिंबा दर्शवला.



यावेळी तुपकर यांनी सरकारला ठाम इशारा देत आंदोलनाची तीव्रता वाढवण्याचा इशारा दिला. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, अडोळी येथील आंदोलन आता केवळ स्थानिक राहणार नाही, तर ते राज्यव्यापी करण्यात येईल. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारने तात्काळ निर्णय घेतला नाही, तर राज्यभर उग्र आंदोलन छेडण्यात येईल, असेही त्यांनी ठासून सांगितले.तुपकर यांनी शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या मांडताना,सर्व शेतकऱ्यांची विना अट सरसकट कर्जमाफी जाहीर करावी

प्रत्येक शेतकऱ्याला सरसकट पिक विमा मंजूर करावातसेच इतर प्रलंबित मागण्या तातडीने मान्य कराव्यातअशी मागणी केली. आंदोलनस्थळी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तरीही गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंदोलनाला उत्स्फूर्त पाठिंबा दिला. विशेष म्हणजे महिला मंडळींचाही मोठा सहभाग या आंदोलनात पाहायला मिळाला.

या प्रसंगी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे,

> **"शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही. सरकारने तात्काळ सरसकट कर्जमाफी व पिक विमा लागू करावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन उभारले जाईल."**
> **— रविकांत तुपकर**

जिल्हाध्यक्ष नामदेव पतंगे, प्रवीण मते, चैतन्य चव्हाण, शांतीराम सावके, भागवत ढवळे, राहुल कावरखे, मनोहर सावके, अशोक जयस्वाल, वाशीम जिल्हाध्यक्ष बालाजी मोरे तसेच आंदोलनाचे प्रमुख सतीश इढोळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

अडोळी येथून पेटलेली ही ठिणगी आता राज्यभर गाजणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत असून, शेतकऱ्यांच्या न्यायासाठीचा हा लढा अधिक तीव्र होणार आहे.

# अमृता अनिल आंग्रे यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : शिळफाटा येथील अमृता अनिल आंग्रे यांचे मथुरा येथे ब्रेन स्ट्रोक या आजाराने वयाच्या 62 व्या वर्षी निधन झाले. त्यांच्यावर शिळफाटा, खोपोली येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्यविधीला मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते. शिळफाटा येथील समाजसेवक,



कै. सौ. अमृता अनिल आंग्रे.
जन्म दि. २९/०९/१९६४ मृत्यू दि. ०९/०४/२०२६

श्रद्धा कॅटरर्सचे अनिल रामचंद्र आंग्रे यांच्या अमृता आंग्रे या पत्नी होत्या.

शिळफाटा आणि खोपोली परिसरात त्यांचे समाजकार्य सर्वश्रुत आहे. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सून, मुलगी, जावई, नात, नातू असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी 18 एप्रिल रोजी नाशिक येथे होणार असून उत्तरकार्य 21 एप्रिल रोजी राहत्या घरी श्री हनुमान मित्र मंडळ, शिळफाटा येथे होईल.

# लिहाखेडीचा आदित्य फरकाडे झाला 'डॉक्टर'; मुख्याध्यापक पित्याचे स्वप्न साकार; परिसरातून एमबीबीएसचा पहिला बहुमान

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड** : अथक परिश्रम आणि दृढनिश्चयाने ग्रामीण भागातील गुणवत्ता सिद्ध करत, लिहाखेडी (ता. सिल्लोड) येथील डॉ. आदित्य विष्णू फरकाडे यांनी वैद्यकीय क्षेत्रात सुवर्णयश संपादन केले आहे. अमरावती येथील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयातून त्यांनी एमबीबीएस ही पदवी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. या ऐतिहासिक यशामुळे लिहाखेडी गावासह संपूर्ण सिल्लोड तालुक्याच्या नावलौकिकात भर पडली आहे. डॉ. आदित्य यांचा शैक्षणिक प्रवास अत्यंत संघर्षाचा राहिला. त्यांचे वडील विष्णू फरकाडे यांचा सहशिक्षक ते मुख्याध्यापक असा प्रदीर्घ प्रवास असून, त्यांनी आपल्या प्रशासकीय जबाबदाऱ्या व कौटुंबिक कर्तव्ये पार पाडताना मुलाच्या शिक्षणासाठी विशेष कष्ट घेतले. या यशात त्यांच्या मातोश्रींच्या संस्कारांचा आणि खंबीर पाठिंब्याचा मोलाचा वाटा आहे. आई-वडिलांच्या कष्टाचे मुलाने पदवीच्या रूपाने खऱ्या अर्थाने सोने केले आहे.लिहाखेडी आणि परिसरातून एमबीबीएस पूर्ण करणारे डॉ. आदित्य हे पहिलेच विद्यार्थी ठरले आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द बाळगली तर ते कोणत्याही स्तरावर यश मिळवू शकतात, हा आदर्श त्यांनी समाजासमोर ठेवला आहे. डॉ. आदित्य फरकाडे यांच्या या यशाबद्दल त्यांचे नातेवाईक, ग्रामस्थ, शिक्षक आणि मित्रपरिवाराकडून सर्व स्तरांतून अभिनंदन आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# बाटली आडवी' होणार की नाही याबाबत अनिश्चितता

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे /महागाव (यवतमाळ )** : महागाव शहरातील प्रभाग क्रमांक एक मध्ये देशी दारूची बाटली कायमची आडवी करण्याची लढाई महिला मतदारांनी केलेल्या हाराकिरीमुळे अपयशी ठरली. अत्यंत अटीतटीच्या लढतीत केवळ एका मताने महिलांचा लढा अयशस्वी झाला. प्रभागातील एकूण महिला मतदानाच्या ५० टक्के मतदानाला अवघे १ मत कमी पडल्यामुळे येथे अनपेक्षितरित्या उभी बाटली जिंकून आली.



देशी दारूची बाटली आडवी करण्यासाठी प्रशासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या महिलांच्या मतदान प्रक्रियेत जवळपास ५० टक्के महिलांनी मतदानाला दांडी मारली. वेगवेगळ्या कारणांमुळे महिला मतदानाला १४५ पैकी केवळ ७७ महिलांनी प्रत्यक्ष मतदान केले. १४५ महिला मतदारांपैकी ५ महिला मतदार मयत असल्यामुळे महागाव नगरपंचायतचे मुख्याधिकारी अजय कुरवाडे यांनी मतदान प्रक्रियेत १४० मतदार अधिकृतरित्या गृहीत धरले जातील अशी आधीच घोषणा केली होती. ५० टक्के मतदानावर बाटली आडवी करण्याचा आदेश जिल्हाधिकारी देऊ शकतात. याचा अर्थ झालेल्या ७७ मतदानापैकी किमान ७० मते आडव्या बाटलीस होणे अनिवार्य होते. तसे झाले तरच प्रभागात आडवी बाटली होणार होती. परंतू आडव्या बाटलीच्या बाजुने ६९ मते पडली. मतदान केंद्रात उभ्या बाटलीच्या बाजूने केवळ ७ मते पडली. एका बॅलट पेपरवर फुलीच्या शिक्क्याऐवजी शाईचा अंगठा लाऊन मतदान केल्याचे आढळले.मतदान अधिकारी अजय कुरवाडे यांनी हे मतदान बाद ठरवले. मतदानासाठी गैरहजर राहिलेल्या ७० महिलांचे मतदान उभ्या बाटलीच्या बाजूने गृहीत धरल्या जाते. त्यामुळे आडव्या बाटलीला अवघे १ मत कमी पडल्यामुळे महिलांनी उभा केलेला हा दारूबंदीचा लढा अगदी काठावर अयशस्वी ठरल्याचे बोलल्या जात आहे. मतदान अधिकारी म्हणून महागाव नगरपंचायत चे मुख्याधिकारी अजय कुरवाडे यांनी काम पाहिले. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक डी. एस. वाघ, उपनिरीक्षक अनिल पिकले, उपनिरीक्षक राज्य उत्पादन पुसद सुकेशनी शिंदे यांच्या सहकार्याने मतदान प्रक्रिया राबविण्यात आली.

प्रभाग १ मधील महिलांचे संघटन करून नगरसेविका जयश्री नरवाडे, नगराध्यक्ष रंजना दीपक आडे, नगरसेवक सुरेश उत्तमराव नरवाडे, अणि नगरसेवक रामराव पाटील नरवाडे यांनी छातीठोकपणे ही लढाई लढली. यात काही नगरसेवकांचे मुक समर्थन होते. मात्र काहींनी उघड उघड उभ्या बाटलीच्या

बाजूने असल्याने महिलांचा लढा हाणून पाडला.जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणार दाद मतदान अधिकारी असलेले मुख्याधिकारी अजय कुरवाडे यांनी केवळ मतमोजणी करून मतदानाची सरासरी स्पष्ट केली. अंतिम निर्णय मात्र जिल्हाधिकारी जाहीर करणार आहेत.

मतदान अधिकारी यांनी बाद ठरविलेले मत आडव्या बाटलीला झाले असल्याने ते वैध ठरवावे यासाठी दारूबंदी निर्मूलन समितीच्या महिला जिल्हाधिकारी यांच्याकडे दाद मागणार आहेत. जिल्हाधिकारी यांनी ते मत वैध ठरवल्यास आडव्या बाटलीचा विजय जाहीर होऊ शकतो.

# सीबीएसई दहावीच्या परीक्षेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा शंभर टक्के निकाल

## ५४ विद्यार्थ्यांना ९५%पेक्षा अधिक गुण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) घोषित केलेल्या इयत्ता दहावीच्या निकालात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने नेत्रदीपक यश संपादन करत आपला दबदबा कायम राखला आहे. यंदाही शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून परीक्षेस बसलेले सर्व ३१० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या शाळेची विद्यार्थिनी अनन्या प्रवीणकुमार भुतडा हिने ९९.२० टक्के गुण मिळवून संपूर्ण नवी मुंबईत प्रथम क्रमांक पटकावण्याचा मान



मिळवला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे चेअरमन तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अव्वल अनन्या भुतडा हिच्यासह सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे अनन्याला २५ हजार, तर द्वितीय मित्तल सुजाभाई पटेल (९८.६० टक्के), तृतीय देवांश विशाल जाधव (९८.४० टक्के), चतुर्थ आणि पाचवा क्रमांक पटकावणारे विद्यार्थी अनुक्रमे अर्णव भारत पाटील आणि विराज संजय अरगडे (दोघांनाही ९८ टक्के) यांना प्रत्येकी १० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. अनन्याने मराठी आणि डेटा सायन्स या विषयांमध्ये १००पैकी १०० गुण मिळवून आपल्या यशात मानाचा तुरा रोवला आहे. केवळ वैयक्तिक यशच नव्हे तर शाळेच्या एकूण कामगिरीचा आलेखही उंचावलेला दिसतो. एकूण विद्यार्थ्यांपैकी ५४ विद्यार्थ्यांनी ९५ टक्क्यांपेक्षा अधिक, १३७ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक, तर २८६ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

विषयनिहाय कामगिरीतही शाळेने बाजी मारली आहे. शाळेतील २७ विद्यार्थ्यांनी डेटा सायन्समध्ये, १६ विद्यार्थ्यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्समध्ये, तर सहा विद्यार्थ्यांनी मराठी विषयात १००पैकी १०० गुण मिळवले आहेत. याशिवाय इंग्रजी आणि सामाजिक शास्त्र विषयातही प्रत्येकी एका विद्यार्थ्याने पैकीच्या पैकी गुण मिळवण्याची कामगिरी केली आहे.

या देदीप्यमान यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, सदस्य ॲड. राहुल घरत तसेच प्राचार्या राज अलोनी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच शिक्षक व पालकांच्या सहकार्याचाही उल्लेख केला. विद्यार्थ्यांची जिद्द, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि व्यवस्थापनाचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व यामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या निकालामुळे रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने शैक्षणिक क्षेत्रातील आपले अग्रस्थान पुन्हा एकदा सिद्ध केले आहे

# देवणी शहरात मानसिक आजारग्रस्त महिलेचा उपद्रव; उपचारासाठी दाखल करण्याची मागणी, प्रशासनाच्या तत्काळ कारवाईची गरज

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी/पांडुरंग कदम कदम** : शहरातील प्रभाग क्रमांक ५ परिसरात एका मानसिक आजारग्रस्त महिलेच्या आक्रमक वर्तनामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित महिला मुख्य रस्त्यावर, एसबीआय बँक शाखेजवळील भागात फिरत असून, काही नागरिकांवर लाकडी दांडक्याने हल्ला केल्याच्या घटना समोर आल्या आहेत. लहान मुलांसह सर्वसामान्य नागरिकांना मारहाण करण्याचे प्रकार घडत असल्याने परिसरातील कुटुंबांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने घर सोडल्याची माहिती समोर आली आहे. बाजारपेठ व गर्दीच्या ठिकाणी दगडफेक केल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून, तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

विद्यमान नगरसेवक जमीर तांबोळी यांनी नगरपंचायत प्रशासनाकडे तक्रार दाखल करून संबंधित महिलेला तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्याची मागणी केली आहे. भारतातील Mental Healthcare Act, 2017 नुसार, एखादी मानसिक आजारग्रस्त




व्यक्ती स्वतःस किंवा इतरांना धोका निर्माण करत असल्यास, पोलिस अधिकारी, वैद्यकीय अधिकारी किंवा कार्यकारी दंडाधिकारी (तहसीलदार) यांच्या माध्यमातून तिला सुरक्षित ताब्यात घेऊन शासकीय रुग्णालयात दाखल करण्याचा अधिकार आहे. मात्र, अशा कारवाईदरम्यान संबंधित व्यक्तीचे मानवी हक्क व सन्मान राखणे बंधनकारक असल्याचेही कायद्यात नमूद आहे. त्यामुळे कोणतीही अनिष्ट घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने त्वरित समन्वय साधून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# रेवदंडा 'हरेश्वर' मैदानावर साईराज अपार्टमेंटचे सांडपाणी, अतिक्रमण; ग्रामपंचायतीचा नाकर्तेपणा - ॲड. रोहित भोईरांची तक्रार

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : रायगड जिल्ह्यातील, अलिबाग तालुक्यातील रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीतील मारुती आळीच्या बाजुलच्या हरेश्वर सार्वजनिक मैदानाची अवस्था विदारक झाली आहे. साईराज अपार्टमेंट या अनधिकृत इमारतीतून थेट सांडपाणी मैदानावर सोडले जात असल्याने खेळाडू आणि मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे, तर लगतच्या वाडी-बागायतदारांकडूनही मैदान अतिक्रमित होत आहे. या गंभीर बाबींबाबत ॲड. रोहित भोईर यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्याधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना लेखी तक्रार पाठवली असून, तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.



१. अनधिकृत बांधकामाचा धोका

हरेश्वर मैदानाजवळील साईराज अपार्टमेंट ही पूर्णपणे अनधिकृत आणि अतिक्रमणकारी इमारत असल्याचे तक्रारीत नमूद आहे. या बांधकामामुळे मैदानाचे क्षेत्र संकुचित झाले असून, खेळाडूंवर अन्याय होत आहे. लगतच्या वाड्या-बागायतदारांकडूनही जमीन हळूहळू खालसा करत असल्याने मैदानाचे अस्तित्व धोक्यात आहे असे ॲड. भोईर म्हणाले.

२. सांडपाणी व कचऱ्याचा विळख

अपार्टमेंटमधील सांडपाणी प्रक्रिया न करता मैदानावर सोडले जात असल्याने तीव्र दुर्गंधी पसरली आहे. आसपासच्या रहिवाशांकडूनही कचरा टाकला जात असल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून, मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे. रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. ग्रामपंचायतीचा दुर्लक्ष

या प्रकरणाबाबत याआधीही खेळाडूंनी तक्रारी केल्या असल्या तरी रेवदंडा ग्रामपंचायत सरपंच आणि ग्रामविकास अधिकारी यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. यामुळेच अनधिकृत बांधकामे फोफावली असून, प्रशासकीय पाठिंबा मिळत असल्याचे आरोप आहेत.

*ग्रामविकास अधिकारी सुदेश राऊत यांचे उत्तर*

या संदर्भात रेवदंडा ग्रामविकास अधिकारी सुदेश राऊत यांच्याशी बोलताना त्यांनी सांगितले, "साईराज अपार्टमेंटला ग्रामपंचायतीने नोटीस बजावली होती. परत नोटीस देण्यात येणार आहे." मात्र, अद्याप ठोस कारवाई झालेली नाही.

***मागण्या आणि इशारा***

ॲड. भोईर यांनी मैदानाचे सर्वेक्षण, अनधिकृत बांधकामे नष्ट, पर्यावरण कायद्यांतर्गत दंड, तसेच सरपंच व ग्रामविकास अधिकाऱ्यांची चौकशीची मागणी केली आहे.


सात दिवसांत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# दहावीच्या निकालात (सी.बी.एस.ई) चित्रसेन नरेंद्र चव्हाण ची उल्लेखनीय कामगिरी

## ९४.२२% गुणांसह शानदार यश संपादन करत उत्तीर्ण

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे** : दि.१५ एप्रिल सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्यूकेशन (सी.बी.एस.ई) अंतर्गत इयत्ता १०वीच्या परीक्षेच्या निकालात पोतद्दार इंटरनॅशनल स्कुल यवतमाळ येथील विद्यार्थी चित्रसेन नरेंद्र चव्हाण हयाने ९४.२२% गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.विशेष म्हणजे,मार्कडा गावातील अशी कामगिरी करणारा तो पहिला मुलगा ठरला आहे. चित्रसेनच्या या उज्ज्वल यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून त्याच्या



कुटुंबियांना त्याचा अभिमान वाटत आहे. त्याच्या यशामागे सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे.यामध्ये आई सोनाली चव्हाण व वडील नरेंद्र थावरू चव्हाण यांचे विशेष मार्गदर्शन लाभल्याचेही त्याने सांगितले आहे.चित्रसेन आपल्या मेहनतीने आई-वडिलांचे नाव रोशन केले असून त्याच्या या यशामुळे गावातील इतर विद्यार्थ्यांना नक्कीच प्रेरणा मिळणार आहे.शाळेच्या शिक्षकवर्गाने आणि मुख्याध्यापकांनी त्याचे कौतुक करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गावातील नागरिकांनीही चित्रसेनच्या घरी भेट देत त्याचा सत्कार केला असून भविष्यात तो आणखी मोठे यश मिळवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्याच्या यशामुळे त्याच्या गावातच नव्हे तर तालुक्यातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# गोपालनगरमध्ये भीषण आग; तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली!

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे राळेगाव** -तालुक्यातील गोपाल नगर येथे दि.१७ एप्रिल रोजी दुपारी साधारण १२ वाजताच्या सुमारास गोपालनगर परिसरात अचानक आग लागल्याची धक्कादायक घटना समोर आली. प्रचंड उष्णतेच्या पार्श्वभूमीवर (सुमारे ४२°C तापमान) ही आग वेगाने पसरत होती, त्यामुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.या घटनेची माहिती गोपाल नगर येथील पंकेश पवार यांनी तात्काळ डॉ. कुणाल भोयर यांना फोनद्वारे दिली.परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन डॉ. भोयर यांनी कोणताही वेळ न दवडता नगरपंचायत सी.ई.ओ.यांच्याशी संपर्क साधला आणि अग्निशमन दलाची गाडी त्वरित घटनास्थळी पाठवण्याची व्यवस्था केली.अग्निशमन दल वेळेत पोहोचल्यामुळे



आणि तातडीने कारवाई केल्यामुळे आग आटोक्यात आणण्यात यश आले. अन्यथा या भीषण उष्णतेत संपूर्ण गोपालनगर परिसराला आगीने वेढा घालण्याची शक्यता होती.या प्रसंगी प्रकाश खुडसंगे, सागर पिंपरे, संजय भगत तसेच गोपालनगर येथील अनेक नागरिकांनी घटनास्थळी उपस्थित राहून मदतकार्य केले. प्रशासनाच्या तत्परतेमुळे आणि नागरिकांच्या सहकार्यामुळे मोठी दुर्घटना टळली, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे.

# पिक विम्यातून वगळलेल्या मंडळाबाबत शेतकऱ्यांचा संताप; बेमुदत ठिय्या आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**सेलू /प्रतिनिधी शिवाजी पवार** : खरीप हंगाम 2025 मधील पिक विमा योजनेतून काही महसूल मंडळे वगळण्यात आल्याच्या निषेधार्थ शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, मागण्या मान्य न झाल्यास 27 एप्रिल 2026 पासून तालुका कृषी कार्यालयात बेमुदत ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

आज दि. 17 एप्रिल 2026 रोजी तालुका कृषी अधिकारी, सेलू यांना दिलेल्या निवेदनात शेतकऱ्यांनी म्हटले



आहे की, कुपटा, मोरेगाव, चिकलठाणा आणि वालूर या महसूल मंडळांना खरीप 2025 च्या पिक विमा योजनेतून वगळण्यात आले आहे. मात्र, मागील वर्षी या भागात मोठ्या प्रमाणात ढगफुटी व अतिवृष्टी झाली होती. दूधना, कसूरा नदी तसेच करपरा नाल्यालगतच्या शेतांमध्ये पिकांचे मोठे नुकसान झाले असून अनेक शेतजमिनी वाहून जाऊन खरडल्या गेल्या आहेत.या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असताना संबंधित मंडळांचा पिक विमा योजनेत समावेश न केल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. कापणी प्रयोगाच्या संयुक्त अहवालात गटविकास अधिकारी, महसूल विभाग, कृषी विभाग आणि विमा प्रतिनिधी यांच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना विमा लाभापासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

तरी संबंधित मंडळातील गावे ही नदीपात्रालगत असल्याने त्यांचा खरीप 2025 पिक विमा योजनेत तातडीने समावेश करून सर्व शेतकऱ्यांना विम्याचा लाभ द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा, शेतकऱ्यांच्या वतीने 27 एप्रिल 2026 पासून तालुका कृषी कार्यालयात बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी जयसिंग शेळके, दगडोबा जोगदंड महाराज, शिवहरी शेवाळे, विजय काष्टे, उद्धवराव मोरे, महेश नावडे, गोपीनाथ सोळंके, कंस मानमोडे, दिगंबर बुधवंत, रमेश शिंदे, जगन शिंदे, सुनील मुळे, प्रल्हाद तुरे, काशिनाथ सोळंके, भीमराव हरके, मंचक सोळंके, विष्णूपंत सोळंके, सुनील गायकवाड, विशाल गायकवाड यांसह अनेक शेतकरी बांधव उपस्थित होते.

# निफाडसाठी जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सुमारे ८ कोटीचा निधी मंजूर - आमदार दिलीपराव बनकर

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी/ विलास गायकवाड** : जिल्हा वार्षिक योजनेतून विविध लेखाशीर्ष अंतर्गत सुमारे ८ कोटी निधी प्राप्त झाला असल्याची माहिती आमदार दिलीपराव बनकर यांनी दिली. जिल्हा वार्षिक योजनेच्या लेखाशीर्ष ३०५४-५०५४ अंतर्गत इजिमा ४२ ते प्रामा २ ते चांदोरी रस्त्याची सुधारणा करणे. (रक्कम रु.४९ लक्ष), शिवडी चारी नं.१४ ते वाबळे वस्ती रस्त्याची सुधारणा करणे. (रक्कम रु.३० लक्ष), शिरसगाव ते हनुमाननगर शांतीनगर कि.मी.०/०० ते २/०० रस्त्याची सुधारणा करणे. (रक्कम रु.४० लक्ष), कोकणगाव गायखे वस्ती कि.मी.०/६५० ते १/६५० रस्त्याची सुधारणा करणे. (रक्कम रु.३० लक्ष), सोनगाव ते गावले वस्ती कि.मी.०/०० ते २/०० रस्त्याची सुधारणा करणे. (रक्कम रु.५० लक्ष), भेंडाळी श ४२ ग्रामा १५४ काटेकर वस्ती, शिंदे वस्ती



शिंगवे रस्ता (भाग भेंडाळी ते करंजगाव) रस्त्याची सुधारणा करणे. (रक्कम रु.३० लक्ष), रामा २७ ते देवपूर रस्ता कि.मी.०/०० ते २/५०० ची सुधारणा करणे. (रक्कम रु.६५ लक्ष), कुरुडगाव काथरगाव सुंदरपूर ते जळगाव कि.मी.१/०० ते २/०० रस्त्याची सुधारणा करणे. (रक्कम रु.३० लक्ष)

जिल्हा परिषद शाळा वर्ग खोल्या नवीन/ दुरुस्ती अंतर्गत सायखेडा, गोदानगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची १ वर्ग खोली बांधणे. (रक्कम रु.११ लक्ष) व भाऊसाहेब नगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची दुरुस्ती करणे. (रक्कम रु.१५ लक्ष), नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत करंजगाव येथे अभ्यासिका इमारत बांधकाम व अनुषंगिक कामे करणे. (रक्कम रु.४० लक्ष) व पालखेड येथे अभ्यासिका इमारत बांधकाम व अनुषंगिक कामे करणे. (रक्कम रु.४० लक्ष), लघुपाटबंधारे योजने अंतर्गत पिंपळगाव बसवंत (देवकर वस्ती)- साठवण बंधारा दुरुस्ती (रक्कम रु.१० लक्ष), पालखेड (आहेर वस्ती) साठवण बंधारा दुरुस्ती (रक्कम रु.१५ लक्ष), लोणवाडी साठवण बंधारा दुरुस्ती (रक्कम रु.१० लक्ष), शिरवाडे वणी साठवण बंधारा दुरुस्ती (रक्कम रु.१० लक्ष), पाचोरे वणी साठवण बंधारा दुरुस्ती (रक्कम रु.१० लक्ष),पर्यटन विकासासाठी मुलभूत सुविधा अनुदान अंतर्गत करंजगाव येथील श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर येथे पर्यटन स्थळाकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. (रक्कम रु.१८ लक्ष) , चाटोरी येथील श्री शनि मंदिर परिसरात पर्यटक निवारा शेड करणे. (रक्कम रु.१५ लक्ष), नांदूर्डी येथील श्री गणपती मंदिर ते जनार्दन स्वामी कुटीया पर्यत सौर पथदीप बसविणे. (रक्कम रु.७.५० लक्ष), नांदूर्डी येथील श्री गणपती मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे. (रक्कम रु.१० लक्ष), नांदूर्डी येथील श्री गणपती मंदिर ते श्री.वैकुंठ पाटील वस्ती पर्यत सौर पथदीप बसविणे. (रक्कम रु.७.५० लक्ष) तर मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधांसाठी विशेष अनुदान योजने अंतर्गत नांदूर्डी येथील योगेश ढोमसे दुकान ते विठ्ठल मंदिर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. (रक्कम रु.१३ लक्ष), तिर्थक्षेत्र/यात्रास्थळ विकास योजने अंतर्गत कसबे सुकेणे येथील श्री भैरवनाथ मंदिर परिसरात भोजन व्यवस्थेसह पर्यटक निवारा शेड बांधणे. (रक्कम रु.२१ लक्ष)सार्वजनिक आरोग्य योजने अंतर्गत ओझर उपकेंद्र ४ येथे नवीन इमारत बांधणे. (रक्कम रु.७५ लक्ष), पिंपरी (भाऊसाहेबनगर) उपकेंद्र येथे नवीन इमारत बांधणे. (रक्कम रु.७५ लक्ष), लोणवाडी उपकेंद्र येथे नवीन इमारत बांधणे. (रक्कम रु.७५ लक्ष)याप्रमाणे निधी प्राप्त झालेला असून नागरीकांना मुबलक सुविधा निर्माण होण्यास मदत होणार असून सदर कामे मंजुरी करिता सहकार्य केल्याबद्दल मा.जिल्हाधिकारी साहेबव सबंधित अधिकारी यांचे निफाड तालुक्यातील जनतेच्या वतीने आमदार दिलीपराव बनकर यांनी आभार मानले.

# सेलू पोलिसांची मोठी कारवाई : गोवंश तस्करी उघड, 45 जनावरे जप्त

**दैनिक युवक आधार**

**सेलू /प्रतिनिधी शिवाजी पवार** : शहरातील रायगड कॉर्नर परिसरात पहाटेच्या सुमारास पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईत अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतूक उघडकीस आली. या प्रकरणात सात पिकअप व एक आयशर अशा एकूण आठ वाहनांमधून जनावरांची तस्करी केली जात असल्याचे समोर आले असून सुमारे 45 बैल जातीची जनावरे जप्त करण्यात आली आहेत.

या कारवाईत जप्त जनावरे व वाहनांसह सुमारे 55 लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. प्राथमिक तपासात ही जनावरे पारडगाव



(ता. परतूर) येथून अमानुष पद्धतीने कोंबून वाहतूक केली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे मोटार वाहन कायदा तसेच प्राणी संरक्षण कायद्यांतर्गत संबंधित आरोपींविरोधात सेलू पोलीस ठाण्यात तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जप्त केलेली जनावरे पुढील काळजीसाठी इटोली (ता. जिंतूर) येथील गोशाळेत हलविण्यात आली आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राऊत व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. पुढील तपास पोलीस कर्मचारी करत आहेत.

# हदगाव उपविभागीय कार्यालयातर्फे 'आपले सरकार सेवा केंद्रा'चा गौरव

## संतोष कदम यांना सन्मान पत्र प्रदान

**दैनिक युवक आधार**

**हदगाव (प्रतिनिधी)/विश्वदीप कांबळे** : शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि विशेषतः आधार नोंदणीच्या कामात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल, हदगाव उपविभागीय कार्यालयाच्या वतीने श्री. संतोष भीमराव कदम यांना 'सन्मान पत्र' देऊन गौरविण्यात आले आहे.

**उत्कृष्ट आधार नोंदणीबद्दल गौरव**

निवघा (बा.) येथील 'आपले सरकार सेवा केंद्र' चालवणारे संतोष कदम यांनी सन २०१६ ते २०२६ या प्रदीर्घ कालावधीत आधार नोंदणीचे काम अत्यंत पारदर्शक आणि चांगल्या प्रकारे पूर्ण केले. त्यांच्या या सातत्यपूर्ण कार्याची दखल जिल्हा सेतू समिती आणि जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी घेतली आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांकडून आधार संच भेट**

संतोष कदम यांच्या उल्लेखनीय कामामुळे माननीय जिल्हाधिकारी साहेबांच्या वतीने त्यांना एक 'आधार नोंदणी संच' देखील प्रदान करण्यात आला आहे. यामुळे त्यांच्या केंद्रावरून नागरिकांना अधिक जलद गतीने आधार सेवा मिळण्यास मदत होणार आहे.

दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी हदगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या एका विशेष प्रसंगी हे सन्मान पत्र प्रदान करण्यात आले. या पत्रावर हदगावचे उपविभागीय अधिकारी श्री. अविनाश कांबळे यांची स्वाक्षरी असून, त्यांनी कदम यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



**"ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय सेवा मिळवून देण्यात सेवा केंद्र चालकांची भूमिका महत्त्वाची आहे. संतोष कदम यांनी गेल्या १० वर्षांत दिलेले योगदान कौतुकास्पद आहे."**

**उपविभागीय कार्यालय, हदगाव**

# असोचॅमतर्फे महाराष्ट्र राज्य परिषदेच्या अध्यक्षपदी श्री मिलिंद हार्दिकर यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**मुंबई/ प्रतिनिधी** : द असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ऑफ इंडियाने (असोचॅम) महाराष्ट्र राज्य परिषदेच्या अध्यक्षपदी मिलिंद हार्दिकर यांची नियुक्ती केल्याचे जाहीर केले. उद्योग, धोरणात्मक उपक्रम आणि विकासाशी निगडित क्षेत्रांमध्ये त्यांना व्यापक नेतृत्वाचा अनुभव आहे. सध्या ते वेलस्पन समूहात ग्रुप स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्हजचे संचालक म्हणून कार्यरत असून विविध क्षेत्रांमध्ये नवकल्पनांवर आधारित व्यवसाय रूपांतरण, शाश्वत औद्योगिक वाढ आणि विस्तार उपक्रमांना त्यांनी गती दिली आहे.

मिलिंद हार्दिकर म्हणाले, "सध्याच्या किमतीनुसार FY२०२७ मध्ये महाराष्ट्राचा जीएसडीपी सुमारे ६५० ते ७०० अब्ज अमेरिकन डॉलर होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे महाराष्ट्र देशातील सर्वात मोठी राज्य अर्थव्यवस्था ठरेल. मागील दशकात (FY१६–FY२६) राज्याने १०% पेक्षा अधिक वार्षिक सरासरी वाढ दर नोंदवला. दरडोई जीएसडीपी सध्याच्या किमतीनुसार ₹३६१,००० पेक्षा अधिक असण्याचा अंदाज असून, यावरून उत्पन्नवाढ तसेच उद्योग, सेवा आणि गुंतवणूक आधारित वाढीचा वेग कायम असल्याचे दिसून येते."

राज्यात सेवा क्षेत्राचा सर्वाधिक वाटा असून तो जीएसडीपीच्या सुमारे ६० % आहे. वित्तीय सेवा, व्यापार, रिअल इस्टेट आणि आयटी या क्षेत्रांमुळे ही वाढ होत असून राज्याची अर्थव्यवस्था सेवा क्षेत्रावर आधारित असल्याचे स्पष्ट होते. उद्योग क्षेत्राचा वाटा २६ % असून उत्पादन आणि बांधकाम क्षेत्रामुळे त्याला पाठबळ मिळत आहे, तर शेतीचा वाटा १४%पर्यंत घसरला आहे. यावरून अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदल दिसून येत असले तरी ग्रामीण उपजीविका आणि स्थैर्यासाठी शेतीचे महत्त्व अद्याप कायम आहे.



२०१९ ते २०२५ या कालावधीत महाराष्ट्रात ₹८.३२ लाख कोटी परकीय गुंतवणूक (एफडीआय) करण्यात आली असून देशात राज्याचा प्रथम क्रमांक आहे. यावरून गुंतवणूकदारांचा मजबूत विश्वास दिसून येतो. अभियांत्रिकी उत्पादने आणि दागिने या क्षेत्रांमुळे ६५ ते ७५ अब्ज डॉलर इतकी निर्यात होत असून निर्यातीमध्येही विविधीकरण दिसून येते. मजबूत आर्थिक पाया आणि विविध क्षेत्रांतील विस्ताराच्या जोरावर २०३० पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन अमेरिकन डॉलरच्या पुढे जाईल, अशी अपेक्षा असून पायाभूत सुविधा, नवकल्पना आणि धोरणात्मक पाठबळ यामुळे ही वाढ साध्य होईल, असे महाराष्ट्र राज्य परिषदेच्या अध्यक्षांनी अधोरेखित केले.

महाराष्ट्र राज्य परिषदेचे अध्यक्ष म्हणून या नव्या भूमिकेत मिलिंद हार्दिकर उद्योग क्षेत्रातील संवादाला चालना देणे, धोरणात्मक मुद्द्यांवर मांडणी करणे आणि गुंतवणूक, नवकल्पना तसेच आर्थिक वाढ वेगाने साध्य करण्यासाठी असोचॅमच्या प्रयत्नांचे नेतृत्व करतील. राज्याच्या विकास आराखड्याला बळ देण्यासाठी परिषद शासन संस्था, उद्योग क्षेत्रातील नेते आणि नवउद्यमी यांच्यासोबत समन्वयाने काम करत राहील. त्यांच्या कार्यकाळात लॉजिस्टिक्स, पायाभूत सुविधा आणि संरक्षण क्षेत्रांवर विशेष भर दिला जाणार आहे.

मिलिंद हार्दिकर यांचे नेतृत्व आणि दूरदृष्टीचा उपयोग करून उद्योग क्षेत्रातील स्पर्धात्मकता वाढवणे, व्यवसाय सुलभतेत सुधारणा करणे आणि शाश्वत विकासाला चालना देणारे प्रभावी उपक्रम राबवण्याची असोचॅमला अपेक्षा आहे.

# मा.जगदीश कांबळे व किसन नलवडे यांची सोसायटीच्या सदस्यपदी वर्णी

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर विविध कार्यकारी सह. सोसायटीमध्ये नवा उत्साह आणि सामाजिक बांधिलकीची नवी पायरी गाठली गेली आहे जगदीश भालचंद्र कांबळे व किसन नलवडे यांची सोसायटीच्या स्वीकृत सदस्य पदी निवड करण्यात आली असून या निवडीमुळे सोसायटीच्या कार्यात नवा जोश आणि प्रेरणा निर्माण झाली आहे.



ही निवड विद्यमान चेअरमन सौ.सिमावहिनी विक्रम निंबाळकर व सचिव संजय सपकळ आणि संचालक मंडळाच्या मासिक बैठकीमध्ये पार पडली.चेअरमन सौ सिमावहिनी निंबाळकर त्यांच्या मार्गदर्शनाखाली झालेली ही प्रक्रिया पारदर्शकतेचे आणि विश्वासाचे प्रतीक ठरली. यावेळी माजी चेअरमन विक्रम भैय्या निंबाळकर,रमेश निंबाळकर परशुराम रायते रविंद्र भोईटे व्हा.चेअरमन सचिन फुले सोसायटीचे संचालक राहुल भैय्या काळे औदुंबर पाटील महेंद्र चव्हाण पिंटू गुप्ते गोपाळ शितोळे पिंटू पाटील मारुती निंबाळकर सचिव संजय सपकळ यांच्या उपस्थितीने या क्षणाला अधिक महत्त्व प्राप्त झाले. निवडीच्या वेळी सभागृहात एक वेगळाच भावनिक वातावरण निर्माण झाले होते. नव्या स्वीकृत सदस्यांच्या चेहऱ्यावर जबाबदारीची जाणीव आणि समाजासाठी काहीतरी करण्याची तयारी स्पष्ट दिसत होती.उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत करताना एकात्मतेचा आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दिला.जगदीश कांबळे व किसन नलवडे यांच्या निवडीमुळे सोसायटीच्या कार्यात नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. त्यांच्या अनुभवाचा आणि सामाजिक कार्यातील सहभागाचा फायदा सोसायटीला होणार आहे. ही निवड केवळ पदाची नाही तर समाजसेवेची शपथ आहे. सणसर विकास सोसायटीने या निवडीमुळे पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की,योग्य नेतृत्व आणि पारदर्शक निवड प्रक्रियेमुळे समाजात विश्वास आणि ऐक्य निर्माण होते. नव्या सदस्यांच्या निवडीमुळे सोसायटीच्या कार्यात नवा अध्याय सुरू झाला असून समाजाच्या प्रगतीसाठी ही पावले महत्त्वाची ठरणार आहेत.

# जय भवानी महाविद्यालयात सलग १८ तास वाचन उपक्रम

## महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जंयती निमित्त ग्रंथालय विभागाचा उपक्रम.

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : पाटोदा येथील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या ग्रंथालय विभागाच्यावतीने दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त सलग १८ तास वाचन उपक्रमाचे ग्रंथालय विभागाच्या वत्तीने आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. या वाचन उपक्रमात विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील पुस्तके, कादंबऱ्या, चरित्रे तसेच स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त साहित्याचे सलग १८ तास वाचन केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरला. या उपक्रमाचे उद्घाटन श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर गढी येथील प्राचार्य विश्वास कदम यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून देत नियमित वाचनाची सवय जोपासण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांनी आपल्या मनोगतात वाचनामुळे ज्ञानवृद्धी होत असून व्यक्तिमत्व विकासास मदत होते. असे सांगितले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून भविष्यातही असे उपक्रम राबविण्याचा मानस महाविद्यालय प्रशासनाने व्यक्त केला आहे. महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा.ज्योती रकटे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केले तर आभार प्रा.बाळासाहेब जोशी यांनी मानले. या उपक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, विद्यार्थ्यांनी तसेच वाचकांनी उत्स्फुर्तपणे आपला सहभाग नोंदवला. महाविद्यालयाच्या या सलग १८ तास वाचन उपक्रमाचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.



# नवीन पनवेलमध्ये 'जय पार्श्व लब्धि महिला मंडळा'ची स्थापना

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर)** : धार्मिक कार्यासोबतच समाजसेवा करण्यासाठी नवीन पनवेलमधील जैन महिलांनी एकत्र येत 'जय पार्श्व लब्धि महिला मंडळा'ची नीव ठेवण्यात आली आहे. या मंडळाच्या माध्यमातून आगामी काळात विविध धार्मिक विधी आणि लोककल्याणाचे उपक्रम राबविण्याचा संकल्प महिलांनी केला आहे. या सेवाकार्याचे पहिले पाऊल म्हणून नवीन पनवेल येथील सेक्टर-१ मधील शिवा कॉम्प्लेक्स परिसरात अन्नदान उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मंडळाची स्थापना आणि सामाजिक उपक्रमाचा प्रारंभ सीमा कांकरिया, पुष्पा गांधी, पद्मावती जैन, चंचल चपलोत, कल्पना कोठारी, ज्योती बाफना, मंजु चतुर आणि कुमारी करुणा गांधी यांच्या पुढाकाराने करण्यात आला. समाजातील गरजू घटकांना मदत करण्यासोबतच जैन धर्मातील मूल्यांची जोपासना करणे, हे या मंडळाचे मुख्य ध्येय आहे. केवळ धार्मिक विधींपुरते मर्यादित न राहता, विविध समाजोपयोगी मार्गांनी उत्कृष्ट कार्य घडावे, अशी भावना यावेळी उपस्थित महिलांनी व्यक्त केली.




# प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या माध्यमातून भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर )** : प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या माध्यमातून विश्वरत्न बोधिसत्व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी आरोग्य तपासणी शिबीर तसेच विविध सामाजिक, तसेच महापुरुषांच्या विचारांचे प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात आले.

आमदार महेश बालदी यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उपस्थित राहून विनम्र अभिवादन केले. यावेळी प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या करंजाडे मधील बौध्द समाज्याच्या वतीने करंजाडे मध्ये भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन निर्माण व्हावे यासाठी आरक्षित भूखंड मागणी केली आहे. करंजाडे मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन व्हावे यासाठी यासंदर्भात सिडको सोबत लवकरच बैठक घेण्यात येणार आहे त्यावेळी प्रबुद्ध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी यांना बैठकीस निमंत्रित केले जाईल.असे सांगितले. यावेळी पनवेल पंचायत समिती सभापती रंजनाताई वास्कर, रुपेश धुमाळ सोनाली जितेकर ( रा. जि.प सदस्य) सौ.मनिषा गजानन पाटील (पनवेल पंचायत समिती सदस्य) मा.सचिन वास्कर, लोकनेते दि.बा पाटील २७ गाव समितीचे उपाध्यक्ष - सी.टी पाटील, सुनील कटेकर, सचिव - प्रेमजी पाटील, सर्व पदाधिकारी सभासद, माजी सरपंच करंजाडे रामेश्वर आंग्रे, मंगेश शेलार (सरपंच करंजाडे, ) सौ.मनिषाताई जयभाये, (ग्रामसेविका मॅडम), सचिन वास्कर, त्याच बरोबर अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी प्रबुद्ध सामाजिक संस्थेचे अध्यक्ष - कुणाल लोंढे. उपाध्यक्ष - गौतम अहिरे, सचिव सुनील बनकर, खजिनदार बापू सावंत, ॲड अमित कांबळे, दिगंबर साळवे, महादेव कांबळे, धनंजय ताटे, गणेश डोळस, राहुल भद्रे, राजेंद्र घोडके, गोकुळ सोनावणे. अनिल दुप्ते, यशपाल कांबळे, पंकज कांबळे, नितीन कांबळे, सचिन सोनवणे , सुबोध सोनावणे, स्वप्नील पवार, कुणाल गायकवाड, उज्वला सोनावणे, कल्पना कांबळे , आरती लोंढे. सोनाली सोनवणे. साधना मोरे, समिधा तांबे. दिपिका कांबळे, आम्रपाली कांबळे, पुनम माने, डायना गायकवाड, नितिक्षा निमसरकार, नैना देवारे, वर्षा कांबळे, सर्व संस्थेचे पदाधिकारी सभासद करंजाडे मधील बौध्द उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



# भक्तीच्या प्रति पंढरी दिघी कोळीवाडा नगरीत आबा चे पुण्यस्मरण कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : ते मरणा एलीचकडे | मज मिळोनी गेले पुढे.|

मग मरणी आणि की कडे |

जातील केवी ||

सद्गुरु भक्त वैकुंठवासी श्री गजानन पद्मा दिघीकर (आबा)यांचे द्वितीय पुण्यस्मरण भक्तीची प्रति पंढरी म्हणून ख्याती असलेल्या श्रीक्षेत्र दिघी या गावी आज रोजी मिती चैत्र व १३ शके १९४८ रोजी बुधवार दिनांक. १५/०४/२०२६ रोजी भक्ती भक्ती भावाने पुण्यआत्मा चे स्मरण दिघी येथे श्री. गुरु. ह भ. प. पुरुषोत्तम दादा महाराज पाटील ( विश्वस्त- संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी श्रीक्षेत्र आळंदी देवाची.) यांच्या शुभ आशीर्वादाने ह. भ. प. श्री. भागवत महाराज साळुंखे

यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सद्गुरु महंत यांच्या पावन वाणीने किर्तन रुपी सेवेकरिता तुकाराम महाराजांचा अभंग.

क्षणभर आम्ही सोसिले वाईट |

साधिलेअवीट निज सुख. ||

सांडी मांडी मागे केल्या भरोवरी अधिक ची दुःखाची या ||

तुका म्हणे येणे जाणे नाही आता| |

राहिलो अनंता ची ये पायी||

या अभंगाद्वारे जन्ममरणाविषयी आपला आणि भगवंताच्या नातं काय आहे काय सत्य आहे

जीवनात माणसाचा खरा जर मित्र असेल तर तो म्हणजेच मृत्यू...

माणसाने मृत्यूला कधीही घाबरू नये सदैव पुण्य कर्म करत भगवंताने दिलेले आयुष्य आनंदामध्ये, सद्गुरु ची सेवा, दिनदुखी त्यांचे सेवा, समाजहित, परोपकारी जीवन जगावे. या प्रकारच् सुंदर मार्गदर्शन उपस्थित सर्व श्रोते वर्ग यांना केले.

आबा चे व्यक्तिमत्व ते काय करावे.वर्णन करणे शब्दांमध्ये फारच कमी पडेल शासकीय सेवा पूर्ण करून अतिशय प्रामाणिकपणे सेवा गोरगरीब जनतेची सेवा, सामाजिक कार्याची आवड, ईश्वरावरती प्रदीर्घ श्रद्धा असल्यामुळे वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून किर्तन रुपी सेवेद्वारे समाज प्रबोधनाचे कार्य त्यामुळे समाजातील सर्व लहान थोर मंडळीचे अतिशय प्रिय असे आबा.

सर्वांना आपुलकी, जिव्हाळा, स्नेह लावून अचानक सर्वांचा निरोप घेत ईश्वरचरणी लीन झाले. त्यावेळेला सबंध दिघी परिसर शोकाकुल वातावरणामध्ये नाहून गेले होते.

त्यांच्या पश्चात त्यांची चार मुले एक पत्नी आणि संबंध दिघीकर परिवार मोठा मुलगा कुटुंबामध्ये वारकरी संप्रदायाचा वारसा लाभल्यामुळे सद्गुरूच्या कृपाशीर्वादाने आज मायबोली चॅनल फेम म्हणून हरीश जी महाराज म्हणून त्याची ख्याती आहे. ते सुद्धा वडिलांप्रमाणे कीर्तन रुपी सेवेद्वारे समाज प्रबोधनाचे कार्य अविरतपणे सातत्याने करत आहेत. त्यांचे दोन भाऊ एक बहीण मुक्ताई.. जणू मुक्ताई प्रमाणेच प्रेमळ या सर्वांना एकत्रित करणारी आई लक्ष्मी माता सर्वांना एकत्रित कुटुंब बांधून समाजसेवेचे कार्य करत आहेत.

आजच्या या पवित्र दिवशी आबा च्या पुण्य आत्म्याचे चिंतन करत समस्त दिघीकर, मेंदाडकर, आप्तेष्ट मित्र मंडळ, अखंड दिघी कोळी समाज बांधव, अखंड वारकरी संप्रदाय दिघी सर्वांनी या पुण्य आत्म्याला ईश्वर उत्तम गती मिळावी म्हणून आठवण काढत भाव पूर्ण नयन अश्रू नि स्मरण करत सर्वांच्या साक्षीने ईश्वरचरणी मंगलमय प्रार्थना करीत अतिशय भक्तीयुक्त अंतकरणाने पावन स्मरण केले.



## संदलमध्ये गेलेला 12 वर्षीय मुलगा 2 तासांत सुखरूप सापडला ; वाठोडा पोलिसांची तत्पर कामगिरी

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू/संपादक नागपूर** : नागपूर, दि. 16 एप्रिल 2026 — वाठोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत हरवलेल्या 12 वर्षीय मुलाचा अवघ्या काही तासांत शोध लावून पोलिसांनी पुन्हा एकदा आपली तत्परता सिद्ध केली आहे.

दिनांक 15 एप्रिल रोजी घरातून निघून गेलेल्या मुलाबाबत त्याच्या आईने 16 एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे 6:15 वाजता वाठोडा पोलीस ठाण्यात माहिती दिली. ही तक्रार मिळताच दिवस पाळी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक कृष्णा साळुंखे यांनी तात्काळ वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना कळवून माहिती नियंत्रण कक्ष व नागपूर ग्रामीण पोलिसांना प्रसारित केली.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार सदर मुलगा ताजबाग येथून एका संदलमध्ये सहभागी झाला असून तो कन्हान येथील "अम्मा का दर्गा" येथे जाणार असल्याचे समोर आले. याची खात्री करण्यासाठी मुलाच्या आईने ताजबाग येथे जाऊन चौकशी केली असता सुरक्षा रक्षकाकडून ही माहिती मिळाली.

त्यानंतर वाठोडा पोलिसांनी तातडीने हालचाल करत पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल



राऊत व पथकाला कन्हान पोलीस ठाणे हद्दीत शोधकार्याकरिता रवाना केले. पोलिसांनी वेगवान आणि समन्वयित कारवाई करत सायंकाळी सुमारे 8:15 वाजता कन्हान येथे सुरू असलेल्या संदलमधून मुलाला सुरक्षितरित्या शोधून काढले.

ही संपूर्ण कारवाई माननीय पोलीस उपआयुक्त (परिमंडळ क्र. 5) व सहाय्यक पोलीस आयुक्त, पारडी विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.हरवलेल्या मुलाचा अल्पावधीत शोध लावून वाठोडा पोलिसांनी पुन्हा एकदा जनतेत विश्वास निर्माण केला आहे.

## बालकांच्या सुदृढ वाढीसाठी 'सकस आहार' अनिवार्य

### पिशोरच्या महाराजस्व शिबिरात पोषण प्रदर्शन; सभापती सुप्रिया घुगे यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/पिशोर:-** "बालकांच्या आणि मातांच्या आरोग्यासाठी सकस आहार ही काळाची गरज आहे. सुदृढ पिढी घडवण्यासाठी पालकांनी जंक फूड व फास्ट फूडचा मोह टाळून अंगणवाडी सेविकांनी सुचवलेला नैसर्गिक व केमिकल विरहित आहार पाल्यांना द्यावा," असे प्रतिपादन पंचायत समितीच्या सभापती सुप्रियाताई अनिलराव घुगे यांनी केले.

येथील 'महाराजस्व समाधान शिबिरा'त एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प-२ अंतर्गत आयोजित पोषण आहार प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. पोषण महा सप्ताहानिमित्त पिशोर येथील अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा स्वयंसेविकांनी या प्रदर्शनाचे अत्यंत प्रभावी आयोजन केले होते.




याप्रसंगी तहसीलदार सारिका भगत, पर्यवेक्षिका श्रीमती पल्हाळ, श्रीमती दौड, श्रीमती मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रदर्शनात बालकांसाठी आवश्यक असलेले मोड आलेले कडधान्य, ताजी फळे, भाजीपाला, दूध, ताक अशा चौरस आहाराचे महत्त्व प्रात्यक्षिकांसह पटवून देण्यात आले.

सभापती घुगे पुढे म्हणाल्या की, "अंगणवाडी सेविका व मदतनीस बालकांना सक्षम करण्यासाठी ग्रामीण भागात मोठे कार्य करत आहेत. पालकांनी त्यांच्या सूचनांचे वेळोवेळी पालन केल्यास बालकांची वाढ योग्य होऊन दवाखान्याचा अनावश्यक खर्च वाचविणे सहज शक्य आहे."

हे प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी कार्यकर्ता शोभाताई निकम, लीला केदारे, नंदा पवार, आशा घुले, चंद्रप्रभा निकम व अलका सूर्यवंशी यांनी परिश्रम घेतले. शिबिरासाठी आलेल्या शेकडो नागरिकांनी व माता-पालकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन माहिती जाणून घेतली.

## फुलचोर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य मोफत आरोग्य शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड/ गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, परमपूज्य विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून फुलचोर येथे भव्य 'निशुल्क आरोग्य तपासणी शिबिराचे' आयोजन करण्यात आले होते. डॉ. आशाताई मेश्राम यांच्या वतीने आयोजित या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन आणि "आरोग्य संपन्न समाज" घडवण्याच्या ध्येयाने डॉ. आशाताई मेश्राम यांनी या सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले होते.




मान्यवरांची उपस्थिती

या शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शिबिराला प्रमुख उपस्थिती म्हणून सुनिता सव्वालाखे मॅडम लाभल्या होत्या. त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. आशाताई मेश्राम यांच्या सामाजिक कार्याचे आणि आरोग्य सेवा क्षेत्रातील योगदानाचे विशेष कौतुक केले.

शिबिराची वैशिष्ट्ये:

तज्ज्ञ डॉक्टरांकडून सेवा: विविध व्याधींवर तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने रुग्णांची मोफत तपासणी केली.

मोफत औषधोपचार: शिबिरात आलेल्या गरजू रुग्णांना तातडीने मोफत औषध वाटप करण्यात आले.

आरोग्य जनजागृती: ग्रामीण भागातील जनतेला आरोग्याप्रती जागरूक करण्यासाठी या शिबिराचा मोठा फायदा झाला.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ . आशाताई मेश्राम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. जयंतीचे औचित्य साधून राबवलेल्या या विधायक उपक्रमाचे फुलचोर परिसरात सर्वत्र स्वागत होत आहे.

## आमच्या मताचा आदर करा!"

### महागावच्या महिलांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर एल्गार

### प्रभाग क्रमांक १ मधील महिला थेट जिल्हाधिकारी कार्यालयात धडकल्या

**दैनिक युवक आधार**
**एम.डी.सुरोशे महागाव :(यवतमाळ )** : 'आडवी बाटली' विजयी घोषित करण्याची ठाम मागणी

महागाव नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रमांक १ मध्ये देशी दारू दुकान व बैठक वाईन बार हटविण्यासाठी घेण्यात आलेल्या मतदान प्रक्रियेनंतर मोठा वाद निर्माण झाला असून, संतप्त महिलांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत प्रशासनाविरोधात जोरदार एल्गार पुकारला.

"आमच्या मताचा आदर करा," असा ठाम नारा देत महिलांनी मतदान प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप केला आहे. तसेच 'आडवी बाटली' या चिन्हाला विजयी घोषित करण्याची जोरदार मागणी त्यांनी केली.

महिलांच्या निवेदनानुसार, दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी सावित्रीबाई फुले कन्या महाविद्यालय येथे मतदान पार पडले. मयत मतदारांची संख्या वजा केल्यानंतर १४० मते ग्राह्य धरण्यात आली. मात्र, मतदार यादीत दोन नावे दुप्पट असल्याचे निदर्शनास आणून देऊनही प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला. त्यामुळे प्रत्यक्षात मतदार संख्या १३८ धरणे आवश्यक असल्याचे महिलांनी स्पष्ट केले.

याशिवाय, एका मतदाराने 'फुलीचा शिक्का' न मारता अज्ञानापोटी 'अंगठ्याचा ठसा' उमटविला होता. हा ठसा 'आडवी बाटली'च्या चौकटीत स्पष्टपणे दिसत असतानाही ते मत अवैध ठरविण्यात आले. या निर्णयावर महिलांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.

महिलांच्या मते, एकूण ७७ मतदानांपैकी तब्बल ७० महिलांनी 'आडवी बाटली' या चिन्हाला समर्थन दिले आहे. त्यामुळे संबंधित मत वैध धरून 'आडवी बाटली' विजयी घोषित करावी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

दरम्यान, मतमोजणीवेळी प्रतिनिधींनी आक्षेप नोंदवण्याचा प्रयत्न केला असता अधिकाऱ्यांनी तो स्वीकारण्यास नकार दिला. "तक्रार असल्यास जिल्हाधिकाऱ्यांकडे जा," असे सांगण्यात आल्याने महिलांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठले.

गेल्या काही महिन्यांपासून दारूबंदीच्या मागणीसाठी संघर्ष करणाऱ्या महागावातील महिलांनी आता निर्णायक पवित्रा घेतला असून, "न्याय मिळाला नाही तर आंदोलन तीव्र करू," असा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला आहे.

## अलिबागमध्ये हिंदू-मुस्लिम ऐक्याची अनोखी ज्योत



### प्रशांत नाईक-अनिल चोपडांचा हाजी इम्तियाज पालकरांना भावनांचा पुष्पवर्षाव

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे /अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : रायगड जिल्ह्यातील अलिबाग नगरीत आज असा क्षण उजळला, ज्याने केवळ सत्कार सोहळा नसून संपूर्ण समाजातील मानवी नात्यांना नव्याने गुंफून एकत्र आणले. अलिबागचे विद्यमान नगरसेवक व माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक आणि नगरसेवक अनिल चोपडा यांनी "रायगड जिल्हा मुस्लिम उत्कर्ष समिती"चे बिनविरोध निवडून आलेले अध्यक्ष हाजी इम्तियाज अहमद अब्दुल सत्तार पालकर यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा पुष्पगुच्छाने सन्मान केला. हा फक्त फुलांचा हार नव्हता, तर प्रेमाचा, आपुलकीचा आणि भावनांचा वर्षाव होता!

वातावरणात शब्द अपुरे पडले होते, पण डोळ्यांतून व्यक्त होणारा आदर, हृदयातील प्रेम आणि नात्यांची उब सर्व काही सांगून गेले. हाजी इम्तियाज पालकर हे नाव केवळ एक व्यक्ती नाही, तर शांतता, संयम आणि माणुसकीचा तेजस्वी प्रवाह आहे. त्यांच्या साधेपणातील हिऱ्यासारखा चमक आणि मनातील महाकाय माणुसकी समाजाच्या प्रत्येक कोपऱ्यात प्रेमाचे गोड नाते पसरवते. हिंदू-मुस्लिम ऐक्याची ज्योत ते कृतीतून सतत प्रज्वलित ठेवतात – जिथे ते उभे राहतात, तिथे भेदभावाच्या भिंती कोसळतात आणि "आपण सारे एकच आहोत" हा निःशब्द संदेश घुमतो.

गरजूंना मदत करताना ते कधी मागे वळून पाहत नाहीत, कारण त्यांच्यासाठी सेवा हीच खरी पूजा आहे. अलिबागसारख्या छोट्या शहरातून उमटलेला हा सत्कार म्हणजे एका सेवाभावी प्रवासाला प्रेमाची दाद देणारा क्षण आहे. प्रशांत नाईक म्हणाले, "हाजी साहेबांच्या कार्याने समाज एकतेचा आदर्श घालून देतात. हा सन्मान आपल्या सर्वांचा आहे." अनिल चोपडा यांनीही सांगितले, "त्यांच्या शांत स्वभावाने भेद मिटून एकत्वाची भावना वाढते. असे नेते समाजाला दिशा देतात."

हा प्रसंग अलिबागवासींसाठी प्रेरणास्थान ठरला असून, तो मानवजातीचे एकत्व सांगतो – धर्म, जात भेदभाव नसून आपुलकीने जोडलेले नाते महत्त्वाचे आहे. अशा घटनांमुळे रायगड जिल्ह्यातील सामाजिक समरसता वाढेल आणि सर्व समाज एकत्र येऊन विकासाच्या वाटचाल करतील.

## स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय रिसोड येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**
**रिसोड (तालुका प्रतिनिधि)रणजितसिह.ठाकुर** : रिसोड: स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय रिसोड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला

कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय उकळकर तर प्रमुख वक्ते प्रा. नंदकिशोर खैरे ,प्रमुख अतिथी प्राचार्य रामचंद्र जाधव होते. प्रथम मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. वाचनालयाच्या वतीने मान्यवरांचे पुष्पगुच्छ व शाल




देऊन सत्कार करण्यात आला

कार्यक्रमाचे प्रस्ताविक वाचनालयाचे संचालक प्राचार्य कमलाकर टेमधरे यांनी केले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारां नुसार वाचनालयाची वाटचाल सुरु आहे.

या वेळी प्राचार्य रामचंद्र जाधव यांनी डॉ. बाबासाहेब बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर बोलताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर, यांनी सगळ्या समाजासाठी,महिला-पुरूष वंचित घटकाच्या उत्थानासाठीच कार्य केले .

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते नंदकिशोर खैरे यांनी डॉ. बाबासाहेब बाबासाहेब आंबेडकर यांचा संपूर्ण जीवन पट सांगताना त्याच्या जन्मामुळे कोट्यावधी कुळांचा उद्धार झाला अशी भरपूर माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय उकळकर यांनी अध्यक्षीय भाषणातून सांगितले की जगातील सर्व श्रेष्ठ संविधान बाबासाहेबांनी भारताला दिले . त्या संविधाना मुळेच सर्व जाती,धर्म, एक संघ आहेत. ते जागतिक ज्ञानाचे प्रतिक आहेत.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शालिग्राम पठाडे यांनी तर आभार डॉ. राजेश डवरे यांनी मानले

कार्यक्रमास उपस्थित प्राचार्य रवी अंभोरे, प्राचार्य बी.बी.चव्हाण, डॉ. गट्टाणी,जगन्नाथ ठोंबरे,प्राचार्य शरद टेमधरे, वानखेडे,तारापुरे, केशव इंगळे विश्वबंर डाखोरे,आदि उपस्थित होते कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन ग्रंथपाल गजानन तारापुरे यांनी केले.

## संघर्ष करण्यासाठी आधी संघटित होणे गरजेचे आहे,– रोशन फुले

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे/भंडारा** : समता सैनिक दलाचा तिसरा वर्धापन दिन पाले पेंढरी येथे उत्साह, शिस्त आणि जोशपूर्ण वातावरणात मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक रोशन तालुकाप्रमुख लाखांदूर यांनी संघर्ष करण्यासाठी आधी संघटित होणे गरजेचे आहे तरच आपल्या संघर्षाला यश प्राप्त होईल असे प्रतिपादन केले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून बुद्ध वंदनेने करण्यात आली. यावेळी उपस्थित समता सैनिक दलाच्या सैनिकांना मार्गदर्शन करताना रोशन फुले पुढे म्हणाले समाजावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी आणि आजची देशातील परिस्थिती पाहता आपल्याला समाज हिताचे रक्षण करण्यासाठी सदैव तत्पर राहिले पाहिजे. आज संविधान धोक्यात आहे म्हणजे आपले स्वातंत्र्य धोक्यात आहे खरं बोलणाऱ्यांना जेलमध्ये पाठवले जाते आणि खोट्याचं राज्य चालते त्यामुळे संघटनेला मजबूत करण्याची वेळ आलेली आहे. सैनिकांनी कुठल्याही परिस्थितीत तत्पर असले पाहिजे असेही ते म्हणाले.

प्राध्यापक गजेंद्र गजभिये यांनी समता सैनिक दलाची स्थापना व त्यामागचे उद्देश आणि त्याची गरज काय हे सैनिकांना उपस्थित त्यांना पटवून दिले. अध्यक्ष असणार सीडी देवरे सर यांनी फुले, शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा जागर समाजात पोहोचवण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

महिला व युवक कार्यकर्त्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग नोंदवत संघटनेची ताकद आणि एकजूट दाखवून दिली. उपस्थितांनी संविधानिक मूल्यांचे जतन, सामाजिक अन्यायाविरुद्ध लढा आणि समतेच्या मार्गावर चालण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री गौरी उप जी ओ सी, उद्घाटक गजेंद्र गजभिये रा. ऑफिसर, मार्गदर्शक रोशन फुले ता प्रमुख,कृष्णा सूर्यवंशी,दिलीप गजघाटे, हरिदास पिल्लेवान, पाहुणे भगवान शिवनकर शालू गजघाटे,अलकाताई नांन्हे, दिगंबर पिल्लेवान, सौरभ गजघाटे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योजना माटे शाखाप्रमुख, रागिना गजघाटे, नंलू गजघाटे, रमा पिल्लेवान, विद्या माटे, मायावती पिल्लेवान,छाया पिल्लेवान,पौर्णिमा गाजघाटे, पौर्णिमा पिल्लेवान नम्रता गजघाटे, भूमिका गाजघाटे संगीता मेंढे, रेखा पिल्लेवान, प्रीती पिल्लेवान, अंगणा पिल्लेवान ,विसण्या पिल्लेवान आणि इतर सैनिकांनी प्रयत्न केले.

या कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, महिला कार्यकर्त्या तसेच समता सैनिक दलाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण असून "समता, स्वातंत्र्य आणि बंधुता" या मूल्यांचा प्रभावी संदेश देण्यात आला.